cmyk

## संपादकीय

### शेवटचा धडा शिकवायची वेळ मात्र घाई नको

काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत कोणत्या प्रकारचे प्रत्युत्तर देतोय याबाबतची उत्सुकता केवळ परकीय देशांनाच नाही, तर देशातील कोट्यवधी नागरिकांनाही आहे. एकीकडे परकीय देश आणि भारताचे मित्र भारताला संयमाची भूमिका घेण्याचे आवाहन करत असताना सर्वसामान्य भारतीय नागरिकाला मात्र यावेळी भारताने ठोस भूमिका घेऊन पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा असेच वाटत आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### मुख्यमंत्र्यांसह अर्थमंत्र्यांवर अ‍ॅट्रोसिटीचे गुन्हे दाखल करा-हाके

पुणेः शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एससी आणि एसटी या प्रवर्गासाठी दिला जाणारा निधी वळविण्यात आला आहे. हा निधी मुख्यमंत्र्यांच्या सूचनेप्रमाणे वर्ग केल्याचे वक्तव्य अर्थमंत्री करीत असतील तर या दोघांवर अ‍ॅट्रोसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, अशी मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पत्रकार परिषदेत केली. याबाबत बोलताना हाके म्हणाले, सामाजिक न्याय विभागाला निधी मिळत नाही, अशी वक्तव्ये त्याच विभागाचे मंत्री संजय शिरसाट करीत असतील तर ते या विभागाला न्याय देऊ शकणार नाहीत. त्यांनी त्वरीत आपल्या मंत्री पदाचा राजीनामा द्यावा. त्याचबरोबर गेली वर्षानुवर्षे अजित पवारच अर्थमंत्री आहेत.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१६ | मंगळवार, दि.६ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# शेत, पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण तातडीने काढणार

## अतिक्रमण हटवण्यासाठी पोलिस बंदोबस्त; गृह विभागाचा आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**शेत आणि पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी राज्य सरकार आता पोलिस बंदोबस्त देणार आहे. यासंदर्भात गृहविभागाने सोमवारी (दि.५) आदेश दिले आहेत. त्यामुळे आता शेत रस्ता आणि पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेला वेग येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.**



### ग्राम विकास विभागाच्या मापदंडानुसार निश्चित होणार रस्ते

गरजेनुसार सर्व प्रकारच्या शेत व पाणंद रस्त्यांचे अतिक्रमण काढणे आणि मोजणी करण्यात येणार आहे. त्यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या मागणी पत्रानुसार पोलीस बंदोबस्त पुरविण्याचे अधिकार तालुका स्तरावरील पोलीस निरीक्षक यांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शेत आणि पाणंद रस्त्यांची मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागाच्या निश्चित केलेल्या मापदंडानुसार रस्ते तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शेती कामासाठी मजूर टंचाईमुळे यंत्रांचा वापर केला जात आहे, परंतु शेत रस्त्याच्या मर्यादेमुळे यंत्र शेतात घेऊन जाण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच शेतकऱ्यांना लहान-मोठ्या शेती कामासाठी वाहतुकीला मर्यादा येतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेत आणि पाणंद रस्त्यांची मोहीम हाती घेण्यात आली. याबद्दल शासन आदेशात अतिक्रमणाबाबत कार्यवाही स्पष्ट करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पान २ वर

## थोडक्यात...

### दहशतवादाविरुद्ध आम्ही भारतासोबत आहोत: पुतिन

नवी दिल्ली-पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात चर्चा झाली आहे. चर्चेदरम्यान, राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला. त्यांनी निष्पाप लोकांच्या मृत्युबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आणि दहशतवादाविरुद्धच्या युद्धात भारताला पूर्ण पाठिंबा देण्याचे सांगितले.

### दिल्लीत लवकरच कृत्रिम पाऊस पडणार

नवी दिल्ली-दिल्लीतील प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी क्लाउड सीडिंगद्वारे कृत्रिम पावसाची तयारी केली जात आहे. त्याची चाचणी मे महिन्याच्या अखेरीस होऊ शकते. आयआयटी कानपूरला हिरवा कंदील मिळाला आहे. यासाठी २ उड्डाणांद्वारे ढगांमध्ये रसायने फवारली जातील. यानंतर पाऊस पडेल. क्लाउड सीडिंगसाठी, प्रत्येकी १.५ तासांच्या दोन उड्डाणे चालवली जातील.

### चिनाबचे पाणी रोखले, आता झेलमचे रोखणार

नवी दिल्ली-सिंधू जल करार स्थगित केल्यानंतर भारताने कारवाई केली आहे. भारताने पाकला जाणारे चिनाबचे पाणीही रोखले आहे. भारत आता पाकला जाणारे झेलमचे पाणी रोखण्याच्या तयारीत असल्याची सुत्रांकडूनम माहिती मिळत आहे.

### बलात्कार प्रकरणात अभिनेता एजाज खान वॉंटेड

मुंबई-अभिनेता एजाज खानच्या अडचणी वाढल्या आहेत. बलात्कार प्रकरणात एजाज खान वॉंटेड असून चारकोप पोलीस त्याचा शोध घेत आहेत. चारकोप पोलीस त्याच्या घरी गेले, पण तो घरी नव्हता. एजाजला कधीही अटक होऊ शकते. एजाज खानविरुद्ध मुंबईतील चारकोप पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेनं त्याच्याविरोधात एफआयआर दाखल केली आहे.

### अजित पवार मुख्यमंत्री होणार नाहीत- संजय राऊत

मुंबई-राजकीयदृष्ट्या शरद पवार हे अजित पवारांना माफ करणार नाहीत. हे घाबरून पळून गेलेली लोकं आहेत. त्यांना मुख्यमंत्री व्हायचंय, पण ते होणार नाहीत. अजित पवार हे कदापि भाजपबरोबर राहून मुख्यमंत्री होणार नाहीत. एकतर त्यांना त्यांचा पक्ष पूर्णपणे भाजपमध्ये विलिन करावे लागेल. मग भाजपचे म्हणून कदाचित भविष्यात त्यांना संधी मिळेल. पण वेगळा गट म्हणून त्यांना कधीच मुख्यमंत्रीपद मिळणार नाही, असे मत राऊतांनी मांडले आहे.

### गोपिनाथ मुंडे, खडसे, महाजनांनी भाजप वाढवला- राऊत

मुंबई-महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष वाढवण्याचे काम गोपिनाथ मुंडे, एकनाथ खडसे, प्रमोद महाजन यांनी केले. देशाच्या स्तरावर हा पक्ष लालकृष्ण अडवाणी यांनी वाढवला. अर्थात अटलजीसुद्धा आहेत. आता बावनकुळेंसारख्या मंडळींनी सत्तेचा आणि पैशाचा मधमस्त वापर करून, इतर पक्ष फोडून आपल्या पक्षाला सूज आणली. आजचा भारतीय जनता पक्ष हा ओरिजिनल भाजप नाही, अशी टीका संजय राऊतांनी केली.

## आपत्कालीन परिस्थितीला तयार राहण्याचे राज्यांना आदेश

# भारत-पाकिस्तान युद्धाचे ढग गडद!

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पहलगाम दहशतवाही हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानी दहशतवादाला त्याच्या भाषेत उत्तर देऊ शकतो अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने भारताच्या तीनही सेना दलांनी तयारीही पूर्ण केली आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासन किती सज्ज आहे, याची चाचणी घेण्यासाठी हा मॉक ड्रिल घेतली जाणार आहे. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वाच्या बैठका वाढल्या आहेत.**

राज्यांनी पोलिस, नागरी संरक्षण यंत्रणा, आरोग्य विभाग आणि अन्य आपत्कालीन सेवांशी संबंधित यंत्रणांना तत्पर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मॉक ड्रिलमध्ये बॉम्बस्फोट, शस्त्रधारी हल्ले आणि नैसर्गिक आपत्ती यांसारख्या विविध परिस्थितींचा समावेश असणार आहे. भारत कोणत्याही क्षणी पाकच्या दहशतवादी स्थळांवर हल्ले करण्याची दाट शक्यता असून त्यादृष्टीने तयारी केली जात आहे. याची कल्पना पाकिस्तानला असल्याने तेथील नागरीक सुध्दा भयभीत झाले आहेत.

## ७ मे रोजी देशभरात ब्लॅकआउट आणि मॉक ड्रिल



### भारत मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण खात्याचे सचिव राजेश कुमार सिंह यांची महत्त्वाची बैठक पार पडली. पंतप्रधान मोदी यांच्या सात लोककल्याण मार्ग या निवासस्थानी ही बैठक झाली. दोघांमध्ये पाऊण तास चर्चा झाली. या बैठकीपूर्वी पंतप्रधान मोदी नौदल आणि हवाई दलाच्या प्रमुखांना भेटले होते. त्यामुळे भारत कोणत्याही क्षणी मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत असल्याचे दिसते.

### मॉक ड्रीलमध्ये काय होणार?

हवाई हल्ल्याचा अलर्ट दिल्यास सायरन वाजवणे. नागरिक व विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे प्रशिक्षण देणे. हल्ल्याच्या वेळी शहर/क्षेत्र 'ब्लॅकआउट' करणे (लाईट बंद ठेवणे). महत्त्वाच्या स्थापत्यांनाच लपवण्याची प्रक्रिया. हल्ला झाल्यास नागरिकांची तातडीने स्थलांतर प्रक्रिया व त्याचा सराव.

### १९७१ च्या युद्धाआधी मॉक ड्रिल

या आधी १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या काळात अशा प्रकारचा मॉक ड्रिल करण्यात आला होता. त्यानंतर पहिल्यांदाच देशपातळीवर अशा व्यापक स्तरावर युद्धजन्य स्थितीचा सराव होणार आहे.

### फिरोजपूरमध्ये आधीच सराव

पंजाबमधील फिरोजपूर छावणीत ४ मे रोजी ३० मिनिटांचा ब्लॅकआउट ड्रिल पार पडला. रात्री ९ ते ९.३० या वेळेत लाईट बंद ठेवून युद्धाच्या परिस्थितीतील सज्जतेचा आढावा घेण्यात आला.

### सरन्यायाधीशांसह मोदी, राहुल गांधींची भेट

काँग्रेस नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधान यांच्या निवासस्थानी राहुल गांधी आणि देशाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत बैठक संपन्न झाली.

# बारावीचा निकाल ९१.८८ टक्के, यंदाही कोकणाने मारली बाजी

**पुणे । प्रतिनिधी**

**या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागीय मंडळातून एकूण १४ लाख ८७,००० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १३ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ९१.८६ इतकी आहे.**

पुणे, नागपूर, मुंबई, पान २ वर



# कृषी सहाय्यक १५ मेपासून 'काम बंद' आंदोलनाच्या तयारीत

## शेतकऱ्यांच्या योजना अडचणीत येण्याची शक्यता

बीड । प्रतिनिधी

राज्यातील कृषी सहाय्यकांनी आपल्या प्रलंबित मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी आंदोलनाचा पवित्रा घेतला असून, दिनांक ५ मे २०२५ पासून आंदोलनाची सुरुवात झाली आहे. राज्य कृषी सहाय्यक संघटनेने हे आंदोलन विविध टप्प्यांत राबवण्याचा निर्णय घेतला असून, अंतिम टप्प्यात १५ मेपासून पान २ वर



## त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर गुन्हा दाखल करा

### भारतीय पुरातत्व खात्याचे पोलिसांना पत्र

**नाशिक । प्रतिनिधी**

गुढी पाडव्यापासून बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असणाऱ्या त्र्यंबकेश्वर मंदिरात विश्वस्त मंडळाकडून भाविकांना बुंदीच्या लाडूच्या प्रसादाचे वाटप सुरु करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर गुन्हा दाखल पान २ वर

## जनसेवेप्रती आपले कर्तव्य हे प्रामाणिक आणि पारदर्शक असले पाहिजे-डॉ.ओमप्रकाश शेटे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीमध्ये अंत्योदयाला प्रथम प्राधान्य आहे. समाजातील शेवटच्या घटकाची उन्नती व प्रगती झाली पाहिजे. त्यामुळे जनसेवेसाठी कार्यकर्त्यांचे कर्तव्य हे प्रामाणिक आणि पारदर्शक असले पाहिजे असे मत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले. माजलगाव, वडवणी व पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.५ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३९.५० क्विंटल | २,४०० | २,८०२ | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड :५२.५० क्विंटल | १,९०० | २,७६० | २,२९२ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५५.०० क्विंटल | २,२८० | २,७०० | २,४३२ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,२०० | ५,४०० | ५,३०० |

## आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांनी मार्ग काढलाच!

# बीड शहराला आठवड्यातून एकदा नियमित पाणी मिळणारच





### साडेसातशे मीटरची पाइपलाइन स्वत: उभे राहून दुरूस्त करून घेतली

**बीड । प्रतिनिधी**

साडेतीन लाख लोकसंख्या असलेल्या बीड शहराला महिन्यात एकदा पाणी मिळते, तेही मुबलक पाणीसाठा उपलब्ध असून! पाणी उपलब्ध असताना देखील बीड शहराच्या घशाला कोरड राहते. केवळ श्रेयवादातून बीडकरांचे पाण्यावाचून हाल केले जातात. यात मात्र आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम एक करून या समस्येतून तोडगा काढण्यासाठी दिवसरात्र एक करून धडपडत आहेत. प्रत्येक अधिवेशन, प्रत्येक नियोजन समितीची बैठक, मंत्र्यांकडे वारंवार बैठका असे सर्वस्तरीय प्रयत्न केले. आणि शेवटी करूनच दाखवले. २० वर्षांपूर्वी झालेल्या पाइपलाइनमध्ये ७५० मीटर पाइपलाइन पूर्णपणे गंजून गेली होती. ती गेल्या महिनाभरात तब्बल ४२ डिग्री तापमानात, भर उन्हात आणि रात्री उशिरा देखील आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी स्वतः उभे राहून पाइपलाइन पान २ वर

cmyk

अग्रलेख

# शेवटचा धडा शिकवायची वेळ मात्र घाई नको

काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत कोणत्या प्रकारचे प्रत्युत्तर देतोय याबाबतची उत्सुकता केवळ परकीय देशांनाच नाही, तर देशातील कोट्यवधी नागरिकांनाही आहे. एकीकडे परकीय देश आणि भारताचे मित्र भारताला संयमाची भूमिका घेण्याचे आवाहन करत असताना सर्वसामान्य भारतीय नागरिकाला मात्र यावेळी भारताने ठोस भूमिका घेऊन पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा असेच वाटत आहे. या सर्वसामान्य नागरिकाच्या मनात पाकिस्तानला धडा शिकवण्याबाबत ज्या अपेक्षा आहेत, त्याचे ओझे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर दिवसागणिक वाढत चालले आहे. यापूर्वी भारताने केलेल्या कारवाईबाबत जोरदार चर्चा झाली असल्याने आता यावेळी भारत कोणत्या प्रकारची कारवाई करतो याबाबतची उत्सुकता असल्यानेच अपेक्षांचे हे ओझे वाढत चालले आहे.

पहलगामच्या घटनेनंतरच सोशल मीडियाच्या माध्यमातून एका वेगळ्या प्रकारच्या युद्धाला सुरुवात झाली होती. पण प्रत्यक्ष युद्धसदृश कारवाई करणे तेवढे सोपे नसते हे सर्वसामान्य नागरिकांनीसुद्धा लक्षात घेण्याची गरज आहे. उरी येथील दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने सर्जिकल स्ट्राइक केला होता किंवा नंतर पुलवामा हल्ल्यानंतर बालाकोट येथे एअर स्ट्राइक केला होता, तेव्हासुद्धा हल्ल्याची घटना आणि कारवाईची घटना यामध्ये बराच कालावधी गेला होता. या सर्व गोष्टी करण्यासाठी विविध प्रकारचे नियोजन करावे लागते. गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये भारताने विविध प्रकारे पाकिस्तानच्या नाड्या आवळण्याचे काम सुरू केले आहे. भारतात वास्तव्यात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना पाकिस्तानात पाठवण्याची मोहीम राबवण्यात आली. आता भारताने पाकिस्तानसोबतचा पूर्ण व्यापार बंद केला आहे. पहलगाम हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून भारत सरकार काही करत नाही असे नाही. उलट पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळून कोंडी करण्याचे काम जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. कारण भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापाराचा विचार केला तर भारत पाकिस्तानमधून खूपच कमी गोष्टी आयात करतो, पण पाकिस्तानला मात्र दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टींसाठी भारतातून येणाऱ्या वस्तूंवर आणि सेवांवर अवलंबून राहावे लागते. साहजिकच लवकरच होणाऱ्या एखाद्या अपेक्षित कारवाईपूर्वी वातावरण निर्मितीसाठी या सर्व गोष्टी केल्या जात आहेत हे उघड आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पहलगाम हल्ल्यानंतर गेल्या दहा दिवसांच्या कालावधीमध्ये पाकिस्तानच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील कारवायाही वाढत चालल्या आहेत. दररोज तेथे गोळीबाराच्या घटना घडत आहेत. भारतातर्फे त्यांना प्रत्युत्तर दिले जात असले तरी पाकिस्तानची मग्रुरी काही कमी होत नाही हेच त्यावरून समोर येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाकिस्तानला शेवटचा धडा शिकवायची वेळ जरी आली असली तरी सर्व बाबी विचारात घेऊनच हा निर्णय घ्यावा लागणार आहे. एकीकडे जगातील मुस्लीम देशांपैकी २५ देशांनी पाकिस्तानला पाठिंबा दिला असला, तरी तुर्कस्तान वगळता इतर देश तसे किरकोळ आहेत. दुसरीकडे यूएई आणि सौदी अरेबिया या प्रमुख मुस्लीम देशांनी मात्र भारताला पाठिंबा दिला आहे हासुद्धा भारताचा राजनैतिक विजय मानावा लागेल. म्हणूनच पाकिस्तानवर कोणतीही जोरदार कारवाई करण्यापूर्वी भारताला पाकिस्तान हा गुन्हेगार आहे आणि आम्ही गुन्हेगाराला शासन करण्यासाठी कारवाई करत आहोत अशा प्रकारची वातावरण निर्मिती करावीच लागणार आहे. कारवाई कोणती करायची आणि कधी करायची याबाबत निश्चितच निर्णय झालेला असू शकतो. पण पत्रकार परिषद घेऊन किंवा एखादी प्रेस नोट काढून अशा प्रकारचे निर्णय जाहीर केले जात नाहीत ही गोष्टसुद्धा सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात यायला हवी. सध्या पाकिस्तानमधील पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान या परिसरामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा फायदाही करून घेण्याचे काम भारत सरकारला करावे लागणार आहे.

देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांचे ओझे जरी सरकारवर असले तरी त्याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष करूनच सरकारला निर्णय घ्यावा लागणार आहे. यावेळी पाकिस्तानला एकदाच आणि शेवटचा धडा शिकवायचे नियोजन करावे लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांच्या कालावधीमध्ये भारतामध्ये ज्या दहशतवादी घटना घडल्या त्या सर्व घटनांमध्ये पाकिस्तान हा देश, पाकिस्तानची आयएसआय ही गुप्तचर संस्था आणि पाकिस्तानमध्ये दडून बसलेल्या दहशतवादी संघटनांचे नेते हे सर्व जबाबदार असल्याचे आतापर्यंत अनेक वेळा सिद्ध झाले असल्याने पुन्हा पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी पाकिस्तानला एकदाच धडा शिकवावा लागणार आहे.

# बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचा कहर: शेतकऱ्यांच्या आशा पाण्यात, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. काही ठिकाणी हलका सरी स्वरूपात तर काही भागांत वादळी वाऱ्यासह गारपीट झाली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांची कापणीची कामे थांबली असून पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.**




सध्या जिल्ह्यात बाजरी, ज्वारी, भुईमूग, उन्हाळी तीळ व भाजीपाला यांची काढणी सुरू आहे. मात्र अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी पिकं भिजून गेली असून, शेतकऱ्यांना फटका बसला आहे. विशेषतः उन्हाळी तीळ व भुईमूग काढणीनंतर मोकळ्या शेतात पडले होते, त्यावर पाऊस पडल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. बाजरी व ज्वारीसारखी धान्यपीके भिजल्याने त्यांची प्रतही खराब होण्याची भीती आहे. बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पावसाने हजेरी लावली. काही भागांत वीज चमक आणि गारपिटीचाही अनुभव आला. ''आम्ही कष्ट करून पिकं उभी केली, आता काढणीला सुरुवात केली होती, आणि हे संकट आलं. आता पिकं खराब झाली तर आर्थिक नुकसान भरून काढायचं कुठून?'' अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. शासनाकडून तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करण्याची मागणी होत आहे.

## गडगडाटासह गारांचा अवकाळी पाऊस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहर आणि परिसरात सोमवारी वादळी वारा आणि मेघगर्जनेसह गारांच्या अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत होता.**



सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास अचानक वातावरणामध्ये बदल होऊन जोरदार वादळी वाऱ्याला सुरुवात झाली त्यातच गारांचाअवकाळी पाऊसही पडू लागला हवामान विभागाने बऱ्याच दिवसांपासून अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार सोमवारी वातावरणामध्ये दुपारपासून अचानकच बदल झाला आणि उन्हामध्ये देखील फरक पडला . मात्र, धग कायम होती. लगेच आलेल्या वादळी वारा आणि गारांच्या पावसामुळे मात्र चांगलीच त्रेधा तिरपीट निर्माण झाली. यामुळे अंबाजोगाई शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला. तालुक्याच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावल्याचे वृत्त आहे. शहराच्या आजुबाजुच्या परिसरामध्येही अचानकच गारांच्या पावसाने हजेरी लावल्याचे वृत्त आहे.

# ढोरवाडी येथे वीज पडून ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेतकरी अभिमान नलबे वय ३५ वर्षे हे शेतात झाडाखाली थांबले असता काल सोमवार रोजी सायंकाळी ६.०० वाजता अचानक आलेल्या अवकाळी पाऊस व वाऱ्यामध्ये त्यांच्या अंगावर वीज पडून ते जागीच मृत्यू मुखी झाल्याची घटना घडलेली आहे.**



वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील अभिमान नलबे वय ३५ वर्षे यांना एक एकर शेती असून त्यांना पत्नी, चार मुली व एक मुलगा असा परिवार असून ते मजुरी व शेती करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत असत यामध्ये या कुटुंबावर काळाने घाला घातला असून काल सोमवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास अभिमान नलबे हे अचानक अवकाळी व वादळ वारा व पाऊस आल्याने झाडाखाली थांबलेले होते यामध्ये या झाडाखाली थांबलेल्या नलबे यांच्या अंगावर वीज कोसळल्याने यामध्ये यांचा जागीच मृत्यू झाला आहे तरी अभिमान नलबे यांच्या जाण्याने पत्नी चार मुली व एक मुलगा हे पोरके झाले असून या कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे तरी अभिमान नलबे हे घरातील कमविते व कर्ते असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याने त्यांचे कुटुंब उघड्यावर पडले आहे तरी त्यांना शासनाने व समाजातील दानशूर व्यक्तींनी व सामाजिक संस्था यांनी तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे.तरी या घडलेल्या दुर्दैवी घटनेची हळहळ व्यक्त केली जात आहे.

# वसंत खेडकरची दलित महिलेस बेदम मारहाण

## घटना सीसीटीव्ही मध्ये कैद; आंबेडकरी जनतेत प्रचंड संताप

**बीड । प्रतिनिधी**

**एका दलित महिलेस घरासमोर राहणाऱ्या रिटायर्ड फौजीने बेदम मारहाण केली असून उपचारासाठी त्या महिलेस जिल्हा शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**



महात्मा फुलेनगर, धानोरा रोड, बीड. या ठिकानी शिक्षक असलेले अंकुश कोरडे व रिटायर्ड फौजी वसंत खेडकर हे समोरासमोर राहतात, गत दोन वर्षापासून किरकोळ कारणांवरून वसंत खेडकर हे कोरडे दाम्पत्यास जानिवपूर्वक त्रास देत आहेत, बुधवार दिनांक ३० एप्रील रोजी असेच कुठलेतरी कारण काढून खेडकर हे कोरडे यांच्या मुलांना रागावले व धमकावून प्रखरतेने जातीचा उल्लेख करून शिवीगाळ केली. त्यावरून कोरडे यांच्या मुलांनी आईस घरात जाऊन सांगितले की बाहेर समोरचे काका ओरडत आहेत. त्याबाबत घराबाहेर येवून दीक्षा अंकुश कोरडे यांनी खेडकर यांना विचारताच मी तुझ्या मुलांच्या अंगावर गाडी घालीन अशी धमकी देवून त्यांनी दिक्षा कोरडे यांचे केस पकडून त्यांचे डोके यांनी त्यांच्या गेटवर आपटले तेव्हा ते मोठ्याने ओरडून म्हणत होते तुम्ही महाराचे लोक खुप माजलात तुमचा माज उतरायला मला वेळ लागणार नाही. मी आर्मीत नोकरी केली आहे तुम्हा महारगाडयांना संपवायला मला वेळ लागणार नाही, तुम्ही आमची बराबरी करता काय अस बरच काही ते बोलत होते त्यावेळी त्यांची पत्नी पुष्पा खेडकर हिनेसुद्धा दिक्षा कोरडे यांना मारहाण केली आणि वसंत खेडकर यांनी दिक्षा यांना लज्जा वाटेल अशा ठिकानी त्यांना स्पर्श करून त्यांचा जानिवपुर्वक विनयभंग केला. यावेळी कोरडे यांची लहान मुले आईची सुटका करण्याबाबत केविलवाण्या आवाजाने ओरडत होती, या नराधमाने या बालकांनाही उचलून फेकून कोरडे यांच्या मुलीला मारहाण केली. हा सर्व प्रकार घरी घडत असताना अंकुश कोरडे हे घरी नव्हते. शिवाजी नगर पोलीस ठाण्यात विनयभंगासह भारतीय न्याय संहितेच्या अनेक कलमाने आणि ॲक्ट्रॉसिटी अधिनियमाने वसंत खेडकर व इतरा विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास करीत आहेत. काल रुग्णालयात जावून अनेक पक्ष संघटनांच्या नेत्यांनी जखमी दिक्षा अंकुश कोरडे यांची भेट घेवून त्यांना धिर दिला आहे. आणि घटणेबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. सदरील गुन्हेगारांना लवकरात लवकर अटक करून अन्यायग्रस्त महिलास न्याय द्यावा अशी सर्व स्तरातून मागणी होत आहे.

# कळंब येथे श्री भगवंत जयंती (प्रगट दिना) निमित्त नामसंकीर्तन महोत्सव सोहळा

**कळंब । प्रतिनिधी**



कळंब येथे प्रतिवर्षाप्रमाणे भगवंत विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे भगवंत जयंती प्रकट दिन निमित्त नामसंकीर्तन महोत्सव सोहळा प्रारंभ ७ मे २०२५ ते सांगता १० मे २०२५ आयोजित करण्यात आला आहे या सोहळा उद्घाटन प्रसंगी हेमंत ढोकले तहसीलदार, कळंब राजेशजी तापडिया नायब तहसीलदार कळंब, बाळकृष्ण गुरसाळे, गोकुळ भराडिया, ना. तहसीलदार कळंब, सुरेशराव कल्याणकर, जयवंतराव कुलकर्णी, श्रीकांत जोशी कळंबकर यांची उपस्थिती असणार आहेत या जयंती उत्सवात किर्तन सेवा ह.भ.प.दत्ता महाराज आंबीरकर, ह.भ. प.बाळासाहेब महाराज बोधले, ह. भ. प. प्रसाद महाराज सहस्रबुद्धे व काल्याची किर्तन सेवा श्रीधर बुवा रामदासी यांची आहे काल्याचा महाप्रसाद गिरीश माने यांच्यावतीने होणार आहे ,यानिमित्त दैनंदिन कार्यक्रम पहाटे ६ ते ७ काकडा आरती ७ ते ७-३० विष्णु सहस्त्रनाम, ७-३० ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ भोजन व विश्रांती, १ ते ५ सामुदायीक भजन, ५ ते ६ हरिपाठ, ७ ते ९ हरीकिर्तन, रात्रौ भोजन श्री ज्ञानेश्वरी पारायण प्रमुख : श्री ह.भ.प. जयवंतराव कुलकर्णी हरिपाठ नेतृत्व : ह.भ.प. काका चोंदे, पांडुरंग माळवदे, सौ. नंदाताई पांचाळ, परिमळबाई घुले महापूजा : दि. ७/५/२५ रोजी पहाटे ६ वा. श्री सुनिलराव वेदपाठक यांचे हस्ते होईल. महापूजा : दि. ९/५/२५ रोजी पहाटे ४ ते ५ श्री महेशअप्पा मुंडे, श्री किशोर मुंडे यांचे हस्ते व श्री भगवंत जयंती निमित्त श्री प्रसाद महाराज सहस्रबुद्धे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम पहाटे ५ ते ७ या वेळेत होईल कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाशराव मोरे, विलासराव मिटकरी, किशोर बियाणी, नागनाथ शेंडगे, बब्रुवान कोळपे, अनंतराव देशमुख, श्रीकांत महामुनी , शाहूराव कुलकर्णी, संजय मुंडे, वसंतराव बारटक्के,विजयसिंह मोहिते,चंद्रशेखर बारटक्के, ज्ञानेश्वर बारटक्के, हे परिश्रम घेत आहेत, भगवंत जयंती उत्सव कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पुजारी जीवनराव रत्नपारखी व भाग्येश रत्नपारखी यांनी केले आहे.

# मयुरी जगतापचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

**अंबड । पतिनिधी**

**अंबड तालुक्यातील एकलहेरा येथील मयुरी नामदेव जगताप या विद्यार्थिनी नुकताच बारावी बोर्डाचा निकाल जाहीर झाल्यानंतर तिने कला शाखेतून ८०%३३ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे**



हिसवन येथील चक्रधर स्वामी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील कॉलेजमधून मयुरी जगताप येणे तृतीय क्रमांक पटकावला तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

पान १वरून...

### शेत, पाणंद रस्त्यावरील

आढावा बैठकीत शेत रस्ते आणि पाणंद रस्त्यांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यानुसार नियोजन विभागाने २७ फेब्रुवारी २०१८ रोजीचा शासन निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार पोलिस यंत्रणेमार्फत बंदोबस्त पुरवण्यात यावा, असेही या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. विविध योजनांच्या अभिसरणामधून पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गृह विभागाची सहमती घेतली आहे. त्यामुळे संबंधित निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस यंत्रणेची जबाबदारी ज्या ठिकाणी अतिक्रमण धारक शेतकरी हे नियमानुसार प्रतिसाद देत नाहीत, अशा ठिकाणी पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्यात यावे. तसेच या बंदोबस्तासाठी पोलिस यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा शुल्क आकरण्यात येऊ नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

------

### कृषी सहाय्यक १५ मेपासून

संपूर्ण काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे. कृषी सहाय्यकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये नियमितिकरण, वेतनवाढ, सेवा सुरक्षा आणि पदोन्नतीच्या संधी यांचा समावेश आहे. या मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, शासनाने यावर कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही, असा आरोप संघटनेने केला आहे. या आंदोलनामुळे राज्यातील विविध कृषी योजना, पीक पाहणी, अनुदान वितरण, शेतकऱ्यांसाठीचे मार्गदर्शन इत्यादी कामांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या अडचणी वाढू शकतात. राज्य शासनाकडून या आंदोलनाची दखल घेतली जाईल की नाही, आणि मागण्या मान्य करून तडजोडीचा मार्ग निवडला जाईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अन्यथा कृषी सहाय्यक संघटनेने जाहीर केलेल्या काम बंद आंदोलनामुळे ग्रामीण भागात कृषी सेवा पूर्णतः ठप्प होण्याचा धोका निर्माण होऊ शकते.

**आंदोलनाचे टप्पे**

५ मे काळी फित लावून कामकाज
६ मे सर्व शासकीय व्हॉट्सॲप ग्रुपमधून बाहेर पडणे व बहिष्कार
७ मे तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन
८ मे सर्व कृषी सहाय्यक सामूहिक रजेवर
९ मे सर्व ऑनलाईन शासकीय कामकाजावर बहिष्कार
१५ मेपासून पूर्ण काम बंद आंदोलनाची सुरुवात

-----------

### बारावीचा निकाल ९१.८८ टक्के,

कोल्हापूर, अमरावती, नाशिक, कोकण, छत्रपती संभाजी नगर, लातूर या ९ विभागातून विज्ञान, कला, वाणिज्य, व्यवसाय, आयआयटी यातून एकूण १४ लाख २७ हजार ८५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. १४ लाख १७ हजार ९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले. १३ लाख २ हजार ८७३ विद्यार्थी पास झाले. ८८ टक्के निकाल लागला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १. ४९ टक्के निकाल कमी लागला आहे. यंदा बारावीचा निकाल कसा लागेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सोमवारी दुपारी ऑनलाईन निकाल जाहीर झाला. यात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मार्क मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १ लाख ४९ हजार ९३२ इतकी आहे. यात फर्स्ट क्लास आणि त्याच्या पुढे संख्या ४ लाख ७ हजार ४३८ विद्यार्थी आहेत. तसेच द्वितीय श्रेणी म्हणजे ४५ टक्के ते ५९. ९९ टक्के मिळवलेले विद्यार्थी ५ लाख ८० हजार ९०२ इतके आहेत. तर ३५ टक्के ते ४४.९९ टक्के मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १ लाख ६४ हजार ६०१ इतकी आहे. असे एकूण १४ लाख ६४ हजार ६०१ पैकी एकूण १३ लाख २ हजार ८७३ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. राज्याचा निकाल ९१.८८ टक्के लागला असून कोकण विभागाने निकालात बाजी मारली आहे.

**नऊ विभागीय मंडळातील एकूण निकाल**

पुणे ९१.३२, नागपूर ९०.५२, छत्रपती संभाजीनगर ९२.२४, मुंबई ९२.२४, कोल्हापूर ९३.६३, अमरावती ९१.४३, नाशिक ९१.३१, लातूर ८९.४३, कोकण ९६.७४

**बारावीचा निकाल यंदा घसरला**

फेब्रुवारी मार्च २०२४ चा निकाल ९३.३७% होता. फेब्रुवारी मार्च २०२५ चा निकाल ९१.८८ टक्के आहे. निकालाचा टक्का १.४९ ने यंदा कमी झाला आहे

**बारावीच्या निकालात यंदाही मुलींची बाजी**

यंदाही बारावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९४.५८ टक्के इतकी असून मुलांची ८९.५१ टक्केवारी इतकी आहे. मुलांच्या तुलनेत मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.०७ टक्क्यांहून अधिक आहे.

**किती रिपीटर विद्यार्थी उत्तीर्ण झाले?**

या परीक्षेत नऊ विभागीय मंडळातून ४२ हजार ३८८ रिपीटरर्सनी नोंदणी केली. ४२ हजार २४ विद्यार्थी परीक्षेला बसले. यापैकी १५ हजार ८२३ पास झाले. एकूण रिपीटर विद्यार्थ्यांच उत्तीर्ण होण्याच प्रमाण ३७.५४ टक्के. ७ हजार ३१० दिव्यांग विद्यार्थी नोंदणी. ७ हजार २५८ विद्यार्थी परीक्षेला बसले. ६ हजार ७०५ पास झाले. निकाल टक्केवारी ९२.३८ टक्के.

**कोकणचा निकाल सर्वाधिक**

कोकणचा निकाल ९६.७४ टक्के सर्वाधिक. लातूर ८९.४६ टक्के निकाल सर्वात कमी. मुली ९४.५८ टक्के उत्तीर्ण, मुले ८९.५१ टक्के उत्तीर्ण.

---------

### जनसेवेप्रती आपले कर्तव्य हे

धारूर तालुक्यातील नवनिर्वाचित भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने माजलगाव वडवणी व धारूर तालुक्यातील नवनिर्वाचित भाजपा पदाधिकाऱ्यांचा सत्कार आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते संपन्न झाला. दिंद्रुड येथे ओम 'साईशिल्प' निवासस्थान येथे पार पडलेल्या सत्कार कार्यक्रमास विविध गावचे सरपंच, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विनायक मामा रत्नपारखी (माजलगाव मंडळ प्रमुख), रूपालीताई कचरे (किटी आडगाव मंडळ प्रमुख) डॉ.अभिजीत सोळंके (पात्रुड मंडळ प्रमुख) वडवणी येथील सुखदेव मामा रेडे (वडवणी मंडळ प्रमुख) या नवनिर्वाचित भाजपा पदाधिकाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, पक्षाने जबाबदारी देणे हा कार्यकर्त्यासाठी सन्मान आहे, परंतु त्यासोबतच आपल्यावर तेवढीच जबाबदारी येते. पक्षाचे निष्ठेने काम करत असताना जनतेच्या सेवेसाठी आपले कर्तव्य हे नेहमीच प्रामाणिक आणि पारदर्शक असले पाहिजे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासोबतच केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच त्याबाबत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. शेटे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे मनोबल वाढले. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी सत्काराला उत्तर देताना आपण जनतेच्या सेवेस कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमात माजलगाव मतदार संघातील भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी, मान्यवर यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी तर प्रस्ताविक अशोक करे यांनी केले. पांडुरंग झोडगे पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन देवदूत प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी संयोजनाची उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली.

-----------

### त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त

करण्यासाठी भारतीय पुरातत्व खात्याकडून त्र्यंबकेश्वर पोलिसांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तिरुपती बालाजी, पंढरपूर, शिर्डी संस्थानप्रमाणे आता त्र्यंबकेश्वरमध्ये देखील गुढी पाडव्यापासून भाविकांना प्रसादाचे बुंदीचे लाडू मिळत आहेत. मंदिराच्या आवारात परवानगी न घेता विश्वस्त मंडळाकडून प्रसादाच्या लाडूंची विक्री होत असल्याप्रकरणी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या लाडू विक्री विरोधात माजी विश्वस्तांनी देखील भारतीय पुरातत्व खात्याकडे तक्रार दाखल केली होती. मंदिराच्या आवारात प्रसादाच्या लाडूंची विक्री होत असल्या प्रकरणी पुरातत्त्व खात्याकडून पोलिसांना पत्र पाठवण्यात आले आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर हे संरक्षित स्मारक असतानाही, तेथे अनधिकृतपणे व्यावसायिक लाडू विक्री सुरू केल्याचा गंभीर आरोप विश्वस्त मंडळावर करण्यात आला आहे. तर त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर गुन्हा दाखल करा, असे भारतीय पुरातत्व खात्याने पाठवलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. आता या प्रकरणावर त्र्यंबकेश्वर पोलीस नेमकी काय कारवाई करणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

-----------------

### बीड शहराला आठवड्यातून एकदा

दुरूस्ती करून घेतली. तसेच वीज पुरवठ्याबाबत असलेली तांत्रिक अडचण दूर करून पाणीपुरवठ्याबाबत असलेले बीड शहरासमोरील मोठे प्रश्नचिन्ह दूर केले. आता बीड शहराला किमान ६ दिवसाला पाणी मिळणार आहे. शेवटी आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी करूनच दाखवले आणि बीडची पाणीबाणी मार्गी लावली.

--------------

**टी.सी व इतर कागदपत्रे हरवली आहेत**

महादेवी गोविंद मुळे रा.डिगोळांबा ता. केज, जि. बीड यांचा १२ वी पासचा टी.सी व इत्तर कागदपत्रे केज बस्थानक परिसरात हरवले आहेत. तरी ज्या कोणाला आढळून आल्यावर खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क:: मो. क्र. ९१७२२९०८८९**

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. ०६ मे २०२५



## बुखारी उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बुखारी उच्च माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली असून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये

उच्च माध्यमिक मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून त्यामध्ये प्रथम क्रमांकावर शेख शाहिस्ता अझीम ८९.६७ टक्के व द्वितीय क्रमांक सय्यद आमेरा राजू ८१.५० टक्के व तसेच मणियार खातीजतुल कुबरा एजाज़ अह्मद हिने ७२ टक्के पटकावून तृतीया स्थान मिळवले आहे व तसेच कला शाखेचा ८८.३३ टक्के निकाल लागला असून त्यामध्ये काझी शीफा अतहर हिने ८५.६७ टक्के गुण मिळवून प्रथम स्थान पटकावले आहे व शेख झीनत अख्तर या विद्यार्थीनीने द्वितीय स्थान मिळवले आहे तसेच शेख समरीन इसहाक हिने ७४.६७ टक्के गुण घेऊन तृतीय स्थान मिळवले आहे उत्तीर्ण विद्यार्थिनींचे बुखारी उर्दू एजूकेश्नल संस्थेचे सचिव खुर्शिद नाईक व संस्थेचे अध्यक्ष अझहर नाईक संस्थेचे सहसचिव इम्रान नाईक,प्राचार्य शेख हारुन बशीरोद्दिन, सहशिक्षक युसुफ देशमुख, शेख अब्दुल गनी,शेख अझहर तसेच सहशिक्षिका शेख फरहीन तबसीन, शेख शाहिस्ता यांनी सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अधिक गतिमान, प्रशासनासाठी ‘टेकवारी’ उपक्रम मार्गदर्शक –उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई । प्रतिनिधी

**प्रशासन काळानुरूप बदल स्वीकारणारे असेल तर लोकांना अधिक गतिमान, पारदर्शक व चांगल्या सेवा मिळू शकतात. सामान्य प्रशासन विभागाने आयोजित केलेला टेक वारी: महाराष्ट्र टेक लर्निंग वीक हा उपक्रम राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. आपण बदलांचा केवळ स्वीकार करत नसून बदलाचे नेतृत्व करत असल्याचा संदेश ‘टेक वारी’ उपक्रमाच्या माध्यमातून जाईल, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.**

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे ‘‘टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक‘‘चे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार, महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर.विमला, प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपालदास यासह ज्येष्ठ सनदी अधिकारी, मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ५ ते ९ मे दरम्यान टेक वारी अंतर्गत हा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपाल दास यांच्या मार्गदर्शनाचा फायदा सर्वांनाच होईल. ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासनाचे परिवर्तन कृत्रिम बुद्धिमत्ता, विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर टेक अशा क्षेत्रातील तज्ज्ञ विविध मार्गदर्शन सत्रांद्वारे हे विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगणार आहेत. काळानुरूप बदल सगळ्यांनी स्वीकारून प्रशासन अधिक गतिमान करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, टेक-वारीमध्ये तणाव




व्यवस्थापन, संगीत थेरपी, ध्यानधारणा, कार्य-जीवन समतोल या विषयांवरील मार्गदर्शन सत्रे आयोजित केली आहेत. यामुळे संतुलित व सुदृढ शासकीय कर्मचारी वर्ग घडविण्यास मदत होईल. महाराष्ट्र ‘आय गॉट’वरही प्रथम येईल - माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून लोकाभिमुख काम करणारे महाराष्ट्र राज्य प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. ‘आय गॉट’ वर प्रशिक्षण पूर्ण करण्यात आपले राज्य पहिल्या तीनवरून प्रथम क्रमांक प्राप्त करेल. प्रशासनाने अधिक गतीमान सेवा देण्यावर भर द्यावा. आपल्या प्रत्येकाच्या कामाच्या मूल्यमापनातूनच एकंदरीत कामाचे मोजमाप होत असते महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्येक बदलाला सामोराही जात आहे. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी देखील हे बदल स्वीकारून आपले काम अधिक गतीमान पद्धतीने करतील, असा विश्वास ॲड. शेलार यांनी व्यक्त केला. इज ऑफ लिव्हिंगमध्ये महाराष्ट्र सर्वात पुढे राहील : प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले की, नवीन तंत्रज्ञान अवगत करून अधिकारी व कर्मचारी काम करत आहेतच पण काळानुरूप आपल्या सेवा इज ऑफ लिव्हिंग असल्या पाहिजेत. त्या अधिकाधिक लोकामिभुख असाव्यात यासाठी प्रशासनाने काम केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. ‘टेक-वारी’ उपक्रमात मंत्रालय ते गावपातळीवरील अधिकाऱ्यांचा सहभाग : आयुक्त आर.विमला महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर.विमला म्हणाल्या की, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या प्रयत्नामुळे आणि राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आज केंद्र शासनाच्या ‘ऑय गॉट’ प्रणालीवर सर्वाधिक प्रशिक्षण घेणारे महाराष्ट्र राज्य देशातील पहिल्या तीन मध्ये आहे. ‘टेक-वारी’ उपक्रम नाविन्यपूर्ण असून त्याचा लाभ नक्कीच सर्व अधिकारी घेतील, असे मत त्यांनी व्यक्त केले. अपर मुख्य सचिव व्ही.राधा यांनी ‘टेक वारी’ या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन अथक परिश्रम घेवून केले, मात्र त्यांच्या वडिलांचे निधन झाले असल्याने त्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकल्या नाहीत. यावेळी अपर मुख्य सचिव व्ही.राधा यांच्या वडिलांच्या निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. मंत्रालयात आरोग्य, शिक्षण, कृषी या विविध क्षेत्रातील स्टार्टअप्सचे, मन:शक्ती प्रयोगकेंद्रातील उपक्रमांच्या माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा नातू यांनी केले.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

**येथील भा शि प्र संस्था संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षी बारावी बोर्ड परीक्षेत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल नव्वद (९०%)टक्के लागला आहे. या मध्ये शाखानिहाय वाणिज्य –९९%, विज्ञान –९८.१९%आणि कला –७९% असा निकाल लागला आहे.तसेच संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण घेणारे ३५ विद्यार्थी आहेत.**

यामध्ये १२ वी वाणिज्य शाखा प्रथम कु.प्रिया हरदास (८९.६७%) व कु. पुजा डुकरे (८९.६७%), द्वितीय –कु. घडसिंग प्रियंका (८८.५०%) तृतीय –कु. धनश्री ताकट (८६.१७%)व कु. तनुजा टकले (८६.१७%)

१२ वी विज्ञान शाखा प्रथम कु सय्यद उझ्मा (८६.३३%), द्वितीय कु. मानसी शिंदे (८५.६७%),कु संपदा कुलकर्णी (८५.६७%)तृतीय चि. शुभम लोखंडे (८४.१७%)आणि १२ वी कला शाखा– प्रथम शेख अल्ताफ (८१.६७%), द्वितीय.कु सोनाली आगे (८०.६७%)व तृतीय –अथर्व माजलगावकर (७९.६७%)यांनी गुणानुक्रमे अव्वल स्थान संपादित केले आहे. या सर्व यशस्वी गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे भा शि प्र संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष सौ. ज्योती ताई ठाकूर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व श्री सिद्धेश्वर संकुलांचे पालक प्रकाश दुगड,केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,कार्यवाह विश्वासराव जोशी,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा अंकुश साबळे, डॉ गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये, कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी यांचेसह सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## कै. चांदमलजी लोढा विद्यालयाची यशाची परंपरा कायम

चौसाळा । प्रतिनिधी

**प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ चौसाळा ता. जि. बीड संचलित, कै. चांदमाजी लोढा विद्यालयात फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा विज्ञान शाखेचा निकाल १००% लागलेला आहे.**

गुणांनुक्रमे १) जाधव आदित्य नारायण ५२३ गुण ८७.१७% प्रथम २) कु. वायसे तन्वी लहू ५१५ गुण ८५.८३% द्वितीय ३) कु. पारडे तन्वी अंकुश ५१० गुण ८५% तृतीय क्रमांक मार्च २०२५ बारावी एकूण ८० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८० सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मध्ये३९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत ३७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत ०४ विद्यार्थी अशाप्रकारे निकाल लागला व चांदमलजी लोढा विद्यालयाचे सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य माननीय अशोक शेठ लोढा यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच शाळेतील मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले गावातील पत्रकार बंधू तसेच शिक्षक प्रेमी यांनी सुद्धा सर्व मुलाचे अभिनंदन केले. अशाप्रकारे लोढा विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली.

## युसूफवडगाव माध्यमिक विद्यालयाची उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

युसूफवडगांव । प्रतिनिधी

**काल बारावी बोर्डाचा निकाल लागला असुन यामध्ये केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील भालचंद्र शिक्षण संस्था लिंबागणेश संचलित युसूफवडगांव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय युसूफवडगांव या शाळेने प्रतिवर्षाप्रमाणे आपल्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केले आहे.**

या विद्यालयातून एच.एस.सी. बोर्ड परीक्षा मार्च २०२५ या परीक्षेसाठी कला शाखेतून ५५ तर विज्ञान शाखेतून ८० असे एकूण १३५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.त्यापैकी कला शाखेतून ४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.तर विज्ञान शाखेतून ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.कला शाखेचा एकूण निकाल ८९.०९%.टक्के असून विज्ञान शाखेचा निकाल.१००.%आहे. ज्यामध्ये कला शाखेतून गुणनुक्रमे सर्वप्रथम येण्याचा मान कु. सायली रवींद्र वैरागे ७९% तर द्वितीय क्रमांकावर सिमरन उमर शेख ७८.६७% आणि तृतीय क्रमांक चि.कुणाल जगन्नाथ खामकर ७२.३३% यांनी पटकावला तर विज्ञान शाखेतून सर्वप्रथम येण्याचा मान कु.रेणुका संजीवन बोराडे ८८.% व द्वितीय क्रमांकावर कु.संस्कृती गणेश सुकाळे ८७.३३% तर तृतीय क्रमांक कु.मंजिरी वैजनाथ थळकरी ८६.३३% यांनी पटकावला या सोबतच कु.पवार साक्षी हनुमंत ८६.१७ % कु.खराडे प्राची आदिनाथ ८५.६७% कु.घुमरे राजनंदिनी प्रदीप ८५.१७% कु.थळकरी वर्षा दत्तात्रय ८५.१७% .या निकालात युसूफवडगांव मध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय विज्ञान शाखेतून विशेष प्रावीण्यासह ३३ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत ४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर कला शाखेतून विशेष प्रावीण्यासह.०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शिक्षण महर्षी स्व.द.बा. घुमरे (तात्या) यांच्या प्रयत्नातून साकारलेली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा असा नावलौकिक आजही कायम ठेवला आहे.तसेच सतत गुणवत्ता विकास व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी मार्गदर्शन करणारे दीपक दादा घुमरे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.या गुणवंत विद्यार्थ्यांना भावी आयुष्यातील शैक्षणिक वाटचालीस आणि या यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे संस्था सचिव दीपक दादा घुमरे,संस्थाध्यक्ष सुकाळे सर, संस्थेचे सर्व संचालक यासोबतच प्राचार्य श्री.भोसले ए.यु.पर्यवेक्षक श्री खरबड आर.बी.आणि सर्व शिक्षकांसह सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# क्रेडाईच्या अध्यक्षपदी सुराणा तर सचिवपदी भराडीया

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई क्रेडाईच्या अध्यक्षपदी संजय सुराणा यांची फेरनिवड तर सचिवपदी पवन गिरधारीलाल भराडीया यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडींचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.**

बिल्डर डेव्हलपर बांधकाम व्यावसायिकांची संघटना क्रेडाई ही संपूर्ण देशभर कार्यरत आहे. क्रेडाई अबाजोगाई शाखेच्या अध्यक्षपदी संजय सुराणा यांची फेरनिवड तर सचिवपदी पवन भराडीया यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी जी.डी.थोरात यांनी सदरील निवडी जाहीर केल्या. सदर नवनिर्वाचित कार्यकारिणी ही सन २०२५ ते २०२७ या वर्षांसाठी निवडण्यात आली आहे. सदरील निवड प्रक्रियेत वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी, बीड क्रेडाईचे माजी अध्यक्ष अतुल संघानी, मार्गदर्शक तथा माजी उपनगराध्यक्ष अनंतराव लोमटे, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, माजी सचिव शकील बागवान, आबा कदम, कृष्णा सुनिलकाका लोमटे, कुलदीप परदेशी, कचरूलाल सारडा, बाळासाहेब थोरात, संतोष जाधव यांनी सहभाग घेतला. सदरील निवड प्रक्रियचे वैशिष्ट्ये म्हणजे सुस्पष्टता, विश्वासार्हता आणि एकमताने घेतलेला निर्णय हे होय. महाराष्ट्र क्रेडाईचे अध्यक्ष प्रफुल्लजी तावरे व सचिव आशिषजी पोखरणा यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाईत क्रेडाईच्या नुतन कार्यकारणीची निवडणुक प्रक्रिया पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जी.डी.थोरात हे तर प्रमुख पाहुणे म्हणून आनंददादा लोमटे व मनोज लखेरा हे मान्यवर उपस्थित होते. अंबाजोगाई क्रेडाईच्या अध्यक्षपदी फेरनिवड झालेले संजय सुराणा हे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबईचे सदस्य आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीत नगरविकास विभागाच्या संबंधित विषयाच्या कमिटीचे को–कनव्हेनर ही आहेत. संजय सुराणा आणि पवन भराडीया यांच्या निवडीबद्दल नवनिर्वाचित कार्यकारिणीचे केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार सौ.नमिता अक्षय मुंदडा, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, रमेशराव आडसकर, राजूसेठ भन्साळी, किशोर परदेशी, भुषण ठोंबरे संजय गंभीरे, शरद इंगळे, आसरार कुरेशी, प्रेमचंद मुथा, सुभाष बडेरा, आनंद जाजू, मुजम्मील कुरेशी, कल्याण काळे, धनराज सोळंकी यांनी अभिनंदन केले आहे. संजय सुराणा यांना



पवन भराडीया (सचिव)
क्रेडाई अंबाजोगाई



संजय सुराणा (अध्यक्ष)
क्रेडाई अंबाजोगाई

बांधकाम व सामाजिक क्षेत्रातील कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे, त्यांच्यावर लोकांचा आणि गुंतवणूकदारांचा विश्वास आहे आणि एक कुशल संघटक, जनहित जपणारे सर्वसमावेशक दृष्टिकोन जपणारे व्यक्तीमत्व म्हणून सुराणा यांनी सर्वांना सोबत घेऊन विविध उपक्रम राबवून क्रेडाई अबाजोगाई शाखेचे ते अध्यक्ष म्हणून सर्वसमावेशक नेतृत्वाचे प्रतीक बनले आहेत. ते आपल्या अनुभवाचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना मिळवून देत आहेत. त्यांच्या कार्यकाळात अंबाजोगाई क्रेडाई अधिक सक्षम, सक्रिय व लोकाभिमुख होईल असा विश्वास त्यांची फेरनिवड करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांना आहे. पवन गिरधारीलाल भराडीया हे बिल्डर डेव्हलपर बांधकाम व्यावसायातील तरूण नेतृत्व तयार होत आहे. भराडीया हे अखिल भारतीय माहेश्वरी युवा संघटनेच्या माध्यमातून समाजकार्य करतात. कोविड काळात त्यांनी गरजूंना भरीव मदत केली आहे. भराडीया परिवार जनतेसाठी सातत्याने पाणपोईची सुविधा उपलब्ध करून देत आहे. धार्मिक, सामाजिक क्षेत्रात भराडीया परिवार जनसेवेसाठी सदैव कार्यरत आहे. आपल्या फेरनिवडीबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अंबाजोगाई क्रेडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय सुराणा म्हणाले की, क्रेडाई संघटनेमध्ये मागील काही वर्षांत आम्ही सर्वजण यांनी मिळून केलेल्या शिस्तबद्ध कामाची पोहोचपावती म्हणून सर्व सदस्यांकडून आपली एकमताने अध्यक्षपदी फेरनिवड करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला. महाराष्ट्र क्रेडाईचे अध्यक्ष प्रफुल्लजी तावरे सर व सचिव आशिषजी पोखरणा यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा एकदा काम करण्याची संधी मिळाली आहे. क्रेडाई ही बांधकाम व्यावसायिकांची राष्ट्रीय पातळीवरील शिखर संस्था असून तिच्या महाराष्ट्रात साठ शाखा आहेत व साडे तीन हजारांहून अधिक सदस्य आहेत. क्रेडाई सदस्य असणे हि एक मानाची बाब असून, सदस्यत्व प्राप्त झाल्यानंतर क्रेडाईचे विशेष कोड ऑफ कंडक्ट असून त्याप्रमाणे अधिकार व जबाबदारी ही असते, सर्व सदस्यांना याचे पालन करणे बंधनकारक असते. बांधकाम क्षेत्रामध्ये कोणते ही बदल घडवताना, नियम बनवताना शासनाच्या वतीने क्रेडाई संघटनेचे मत विचारात घेतले जाते, क्रेडाई संघटने बरोबर चर्चा ही केली जाते. क्रेडाई संघटनेला बांधकाम व्यावसायिक व ग्राहक यामधील दुवा मानला जातो. ग्राहकांची कोणती ही अडचण किंवा तक्रार असल्यास ती न्याय्य पद्धतीने क्रेडाई मार्फत सोडविली जाते. शासकीय नियमानुसार रेराकडे प्रकल्प नोंदणीकृत करण्यासाठी क्रेडाई सदस्य असणे बंधनकारक आहे. अशी माहिती अंबाजोगाई क्रेडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय सुराणा यांनी दिली आहे. क्रेडाई अंबाजोगाईच्या नुतन कार्यकारणीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

## पान ६ वरून...

### प्रा. डॉ.कल्पना विधाते

मनोगत झाले. या शानदार सोहळ्या साठी संस्कार विद्यालयातील विदयमान मु.अ. सतीश गंधे , मु.अ एल बी जाधव , एलएस जोशी , एम आर कुलकर्णी , आर. टी. शिंदे , जालींदर तागड , दत्तात्रय सुलाखे , सह सर्व शिक्षकवृंद , नातेवाईक व मित्र परिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक शामसुंदर घाडगे , सुत्रसंचालन घोडके व आभार वर्षा राऊत यांनी मानले.

### गजानन विद्यालयाचा

राजू ७३.३३%, वाणिज्य शाखेतून प्रथम चि.गवते नवनाथ दत्तात्रय ८०.३३%, द्वितीय चि.गवते पियुष अनिल ७८.८३%, तृतीय कु.वाघमारे राजश्री अण्णासाहेब ७८.००%, व्यवसाय अभ्यासक्रमातून प्रथम गणगे बाळासाहेब महादेव ८२.१७%, द्वितीय नागरगोजे बालाजी मच्छिंद्र ८२.००%, तृतीय कुटे बालाजी अशोक ८०.८३% गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहायक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, प्रकाश राठोड, गजानन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य भांगे के. आर., सर्व कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### मुलींना स्वातंत्र्य दिल्यास

भोसले, शिबीर प्रमुख डॉ.सारिका जगताप यांच्यासह शिबिरार्थी मुलीं मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगेश्वरी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### बारावी परीक्षेत मोनिका

अंथरवन पिंपरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून तिने प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या घवघवीत यशाबद्दल तिचे आईवडील, संस्थेचे संस्थाचालक दिनेश पवार साहेब, प्राचार्य खंदारे सर, प्रा.पवार सर, प्रा.सिरसाट सर, प्रा. आखाडे सर, प्रा. श्रीमती तांबे मॅडम, प्रा.श्रीमती लगसकर मॅडम, सहशिक्षिका श्रीमती कांबळे मॅडम, सहशिक्षिका श्रीमती खंदारे मॅडम यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

### शेतकऱ्याचा मुलगा

या यशाबद्दल गंगामसला येथील सतीश सोळंके,डॉ. अभिजित सोळंके,सरपंच भालचंद्र सोळंके, मोठेवाडी येथील उपसरपंच अंगद खेत्री, प्रा .डॉ.बापुराव वराडे,समता परिषदेचे ता.अध्यक्ष जगन्नाथ खेत्री, प्रा. डॉ.नितीन जाधव,राहुल सुरवसे,भारत पास्टे, हनुमान पास्टे, ॲड.पांडुरंग गोंडे, प्रविण प्रधान यांनी ऋषिकेशचा सत्कार करून अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चेअरमन रंजीत जाधव,विश्वांबर बागल,दत्तात्रय प्रधान, दत्तात्रय बागल, राजकुमार आब्दल यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील महिला व ग्रामस्थांची मोठी उपस्थीती होती.

## गोदावरी दुधना महाविद्यालयाचे १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

येथील गोदावरी दुधना कनिष्ठ महाविद्यालयाने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून विज्ञान शाखेचा निकाल ९८.०९ टक्के तर कला शाखेचा निकाल ८०.१८ टक्के लागला आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९०.२७ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेतून समृद्धी बुगदे ९१.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. रसिका भंडारी ८७.१७ टक्के गुण मिळून द्वितीय तर झारा खान ८६.८३ टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. कला शाखेतून पुनम जामकर ६८ टक्के गुण मिळवून प्रथम,शितल घायतिडक ६६.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर अभिषेक इदगे ६५.८३ टक्के गुण मिळून तृतीय आला आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रवीणराव देशमुख, प्राचार्य टी.एस. खान, प्रा.संजय झोडगे,प्रा.तुषार चाळक,प्रा.अमोल झोडगे,प्रा.प्रशांत जाधव,प्रा.स्नेहा सोळंके,परमेश्वर पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## डॉ.विवेक राठोड एमबीए अवार्डने सन्मानीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर येथिल बेस्ट हेअर ट्रान्सप्लाँट सेन्टरने महाराष्ट्रात विश्वासार्ह श्रृंखला निर्माण केल्याबद्दल संचालक डॉ.विवेक राठोड यांना सिने अभिनेते इम्रान हश्मी यांच्या हस्ते मिलेनियम ब्रिलियंस अवार्ड देवुन सन्मानित करण्यात आले आहे.**

वैद्यकीय क्षेत्रात शास्त्रशुध्द व शस्त्रक्रियेद्वारे हेअर ट्रान्सप्लाँट करणारी विश्वसनीय संस्था म्हणुन छ.संभाजीनगरच्या बेस्ट हेअर ट्रान्सप्लाँट ब्रँडने अल्पावधील नावलौकिक मिळवला आहे. बेस्टचे फाऊंडर व सीईओ डॉ.विवेक राठोड हे यापुर्वी एआयडीपी संस्थेचा मंत्री



ना.आशिष शेलार यांच्या हस्ते आशिया पेसिफिक डेन्टल एक्सलन्स, मुंबई येथिल एसीई संस्थेचा सिने अभिनेत्री मलाईका अरोरा यांच्या हस्ते ‘‘बेस्ट कॉस्मेटॉलॉजिस्ट व ट्रायकॉलॉजिस्ट‘‘ पुरस्कार आणि लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड सन्मानाचे मानकरी ठरले असुन हेअर ट्रान्सप्लाँट आणि स्किन क्षेत्रातील त्यांचा अनुभव, व्यासंग, सेवाकार्य व योगदान मैलाचा दगड ठरले आहे. नुकताच दिल्ली येथे महाराष्ट्रात हेअर ट्रान्सप्लाँट व सौंदर्यचिकित्सा क्षेत्रात सर्वाधिक विश्वासार्ह श्रृंखला निर्माण केल्याबद्दल सिने अभिनेते इम्रान हश्मी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देवुन डॉ.विवेक शंकर राठोड यांना सन्मानित केले आहे. छ.संभाजीनगरसह अहिल्यानगर (अहमदनगर) आणि चिखली (बुलढाना) येथे बेस्टच्या ब्रांच सेवारत असुन या तीनही बेस्ट हेअर ट्रान्सप्लाँट सेन्टरमधुन त्वचेच्या सर्व समस्या, केसगळती, टक्कल किंवा केसांच्या समस्या असलेल्या रुग्णांना दिलासा मिळत आहे. डॉ.विवेक राठोड यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

cmyk

# 'ठिंबक व तुषार सिंचन प्रणालीबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण आवश्यक

## कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांचे प्रतिपादन



मुंबई : ठिबक व तुषार सिंचन संचाचे वितरण करताना त्याची पूर्ण माहिती शेतकऱ्यांना देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना ही प्रणाली कशी वापरावी याचे प्रशिक्षण या संचाचे वितरण करणाऱ्या साहित्य विक्रेत्यांनी द्यावे, असे निर्देश कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे राष्ट्रीय कृषी विकास योजना : प्रति थेंब अधिक पीक (ठिबक व तुषार) अंमलबजावणी संदर्भात झाली. या बैठकीला कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, ईरीगेशन असोसिएशनचे अध्यक्ष झुंबरलाल भंडारी यांच्यासह संघटनेचे सदस्य, कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, ठिबक आणि तुषार सिंचन संचाचे वितरण कंपन्यांद्वारे केले जाते. या योजनांमध्ये, शेतकऱ्यांना अनुदान आणि सवलती मिळतात. पाणी वाचवण्यासाठी आणि पिकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी ठिबक सिंचन उपयुक्त आहे, तर तुषार सिंचन मोठ्या क्षेत्रांसाठी योग्य आहे. ठिबक व तुषार सिंचन संच शेतात बसविल्यानंतर त्याचा योग्यप्रकारे वापर होणे गरजेचे आहे. तसेच जास्त कालावधीपर्यंत ही यंत्रणा शेतकऱ्यांना वापरता यावी यासाठी हे संच वापरण्याचे कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे. ज्या कंपन्या शेतकऱ्यांना याबाबत योग्य ते प्रशिक्षण देणार असतील त्या कंपन्यानाच शासन अनुदान देण्यासंदर्भात प्राधान्यक्रम निश्चति करेल असेही कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

# पावसामुळे डागाळलेल्या आंब्याचे असे करा व्यवस्थापन!



सध्या महाराष्ट्रात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे, त्यामुळे आर्द्रतेमध्ये वाढ झाली आहे. फळांचा राजा आंब्याचा मोसम सुरू असताना या पावसामुळे आंब्याच्या फळांवर डाग पडत आहेत. करपा रोगामुळे आंब्याच्या फळांवर काळे डाग पडत आहेत. तसेच देठकूज या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता देखील आहे.

अशा परिस्थितीत आंबा टिकण्यासाठी बुरशीनाशकाची फवारणी करणे उपयुक्त होईल, असा सल्ला डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील तज्ज्ञांनी सांगितले आहे. यासाठी काही विशेष उपाय सुचविले आहे. जाणून घेऊ याबद्दल.

अशी घ्या काळजी : शेतकऱ्यांनी अझॉक्सीस्ट्रॉबिन या बुरशीनाशकाची २३.५ ई.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात स्टिकर मिसळून फवारणी करावी. आर्द्रतेमध्ये वाढ झाल्यामुळे २ फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यासाठी हेक्टरी ४ नग रक्षक सापळे वेगवेगळ्या ठिकाणी झाडांच्या खालील बाजूंच्या फांद्यावर लावावेत.

फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावीत आणि बागेत स्वच्छता ठेवावी. तयार झालेली आंबा फळे काढताना सकाळी १० वाजेपर्यंत व सायंकाळी ४ नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने काढणी करावी. काढणी पश्चात बुरशीजन्य रोगांपासून बचाव करण्यासाठी काढलेली फळे लगेचच ५० अंश सेल्सिअस पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर सावलीत वाळवावीत. तसेच फळांची वाहतूक करताना रात्रीच्या वेळीस करावी.

# तंत्र गांडूळ खत निर्मितीचे




शेतीमध्ये उत्पादन वाढीसाठी मोठया प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जातो. त्यामुळे जमिनीचे आरोग्य धोक्यात येत आहे. जमिनीचे आरोग्य चांगले राखण्यासाठी शेतीमध्ये सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. सेंद्रिय खतांपैकी एक उपयुक्त खत म्हणून ''गांडूळखत'' ओळखले जाते. रासायनिक खतांना गांडूळखत हा उत्तम पर्याय आहे. सेंद्रिय पदार्थांच्या वेगवान विघटनामध्ये गांडूळ अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावतात. गांडूळखताच्या वापरामुळे जमिनीचा पृष्ठभाग सुपिक बनतो. गांडूळ काही झाडांची पाने विशेष आवडीने खातात. पानांचा आकार आणि त्यातील रासायनिक घटक ह्याप्रमाणे त्यांची पसंती असते. आंबा, भात, पेरु, काजू, निलगिरी इ. वनस्पतींची पाने गांडुळ आवडीने खातात. गांडूळ कुजलेले सेंद्रिय पदार्थ जमिनीत मिसळण्याची महत्त्वाची भूमिका करतात.

गांडूळखताचे फायदे :जमिनीचा पोत सुधारतो. मातीच्या कणांच्या रचनेत योग्य असा बदल घडविला जातो. गांडुळाच्या बिळांमुळे झाडाच्या मुळांना इजा न होता उत्तम मशागत केली जाते. जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. जमिनीची धूप कमी होते. बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होते. जमिनीचा सामू (पी.एच.) योग्य पातळीत राखला जातो. गांडूळ खालच्या थरातील माती वर आणतात व तिला उत्तम प्रतीची बनवतात. गांडुळखतामध्ये ह्युमसचे प्रमाण भरपूर असल्यामूळे नत्र, स्फुरद, पालाश व इतर सुक्ष्मद्रव्य झाडांना भरपूर व लगेच उपलब्ध होतात. जमिनीतील उपयुक्त जिवाणूंचा संख्येत वाढ होते. ओला कचरा व्यवस्थापन होते. मातीचा कस टिकून राहतो. या खतामुळे मातीमधील सूक्ष्मजीव टिकून राहतात. ह्या खतामुळे जमिन सुपीक राहते.

इतर रासायनिक खतावर पूर्णतः अवलंबून न राहता स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल. जमिनीची उत्पादन क्षमता वाढते. पाणी देण्याचा कालावधी कमी होतो. झाडांना, पिकांना पाणी देण्याचे प्रमाण कमी होत असल्याने मिळणारे उत्पादन जास्त व चांगल्या दर्जाचे असल्याने शेतमालाची चांगली किंमत येते. रासायनिक खताचा खर्च कमी आणि पिकाच्या निरोगी वाढीमुळे कीटकनाशकाच्या खर्चात बचत. मजूर वर्गावर होणारा खर्च कमी. गांडूळखत निर्मितीमुळे ग्रामीण भागात बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. माती, खाद्य पदार्थ आणि जमिनीतील पाण्याच्या माध्यमाद्वारे होणारे प्रदूषण कमी होते. जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ होते. पडीक जमिनीची धूप व क्षाराचे प्रमाण कमी होते. रोगराईचे प्रमाण कमी होऊन आरोग्य चांगले राहाते.

गांडूळखत तयार करण्यासाठी महत्त्वाच्या बाबी : गांडूळखत प्रकल्प सावलीत व दमट हवेशीर ठिकाणी असावा. शेणखत व शेतातील पिकांचे अवशेष व झाडाचा पाला यांचे ३:१ प्रमाण असावे व गांडूळ सोडण्यापूर्वी हे सर्व १५-२० दिवस कुजवावे. खड्ड्याच्या तळाशी प्रथमत: १५ ते २० सें.मी बारीक केलेला वाळलेला पाला पाचोळा टाकावा. गांडुळाच्या वाफ्यावर गांडुळे सोडण्याआधी १ दिवस पाणी मारावे. गांडुळाच्या वाफ्यावर दररोज किंवा वातावरणातील उष्णतेचे प्रमाण पाहून पाणी मारावे. व्हर्मीवॉश जमा करण्यासाठी गांडूळबेडला एक विशिष्ट जाळी दिलेली असावी, तेथे खड्डा करून व्हर्मीवॉश जमा करण्याचे नियोजन करावे.

# हळदीची सुधारित पद्धतीने लागवड करा अन् मिळवा भरघोस उत्पादन



खरीप हंगामात इतर पिकांसोबत शेतकरी हळद लागवड करतात. चांगल्या जातीची निवड आणि आधुनिक लागवड पद्धती यामुळे हळद पिकाचे चांगले उत्पादन मिळते.

हळद लागवड कालावधी : हळदीची पेरणी १५ मे ते जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करता येते. सिंचनाची सोय असल्यास अनेक शेतकरी एप्रिल-मे महिन्यातही पेरणी करतात.

जमीन आणि हवामान : हळदीसाठी वालुकामय व चिकणमाती जमीन उत्तम आहे. हळद लागवड करण्यापूर्वी जमिनीचा चांगला निचरा झाला असल्याची खात्री करा. पाणी साचलेल्या जमिनीत हळद नीट वाढू शकत नाही. हळदीची लागवड उष्ण व दमट हवामान असलेल्या भागात केली जाते. या पिकाच्या वाढीसाठी इतर पिकांपेक्षा जास्त खतांची आवश्यकता असते.

हळदीच्या सुधारित जाती : आर एच ५, राजेंद्र सोनिया, पालम पितांबर, सोनिया, सुगंध, सूरमा, सुदर्शन, सगुणा, रोमा, कोईम्बतूर, कृष्णा, आर. ९/९०, - १३/९०, पालम लालिमा, १८, १, पंत इत्यादी हळदीच्या सुधारित जाती आहेत.

हळद लागवडीसाठी चांगले उत्पादन देणाऱ्या सुधारित जातींची निवड महत्त्वाची ठरते. या सर्व जाती २०० ते २५० दिवसांत तयार होतात.

लागवड पद्धती : १) सरी वरंबा पद्धत - हळद पिकास पाट पाणी पद्धतीने सिंचन करावयाचे असल्यास ही पद्धती फायदेशीर ठरते. २) रुंद वरंबा पद्धत- ठिबक सिंचन पद्धती उपलब्ध असल्यास रुंद वरंबा पद्धतीने लागवड करावी. या पद्धतीने लागवड केल्यास गड्डे चांगले पोसतात. परिणामी उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. रुंद वरंबा पद्धतीने हळद लागवड केल्यास वरब्यांवर पडणाऱ्या जास्तीच्या पाण्याचा निचरा होण्यास मदत होते. परिणामी कंदकूज रोगापासून हळद पिकाचे संरक्षण होते.

बेणे निवड : एक हेक्टर लागवडीसाठी २५ क्विंटल जेठे गड्डे (त्रिकोणाकृती मातृकंद) बियाणे आवश्यक असते. साधारण ५० ग्रॅमपेक्षा अधिक वजनाचे सशक्त, रसरशीत तसेच नुकतीच सुप्तावस्था संपवून थोडेसे कोंब आलेले असावेत. गड्डे स्वच्छ करून त्यावरील मुळ्या काढून घ्याव्यात. कुजलेले, अर्धवट सडलेले बियाणे लागवडीसाठी वापरू नये. जेठे गड्डे उपलब्ध होत नसतील तर बगल गड्डे (४०-५० ग्रॅम) किंवा हळकुंडे (३० ग्रॅमपेक्षा जास्त वजनाचे) बेणे म्हणून वापरावे. निवडलेली हळकुंडे ठळक, लांब, जाड, ठसठशीत वाढलेली, निरोगी आणि एकसमान आकाराचे भेसळमुक्त असावेत.बेणे प्रक्रिया : रासायनिक बेणे प्रक्रिया - क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि अधिक कार्बेन्डाझिम (५० टक्के पाण्यात मिसळणारे) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात निवडलेले गड्डे १५ ते २० मिनिटे बुडवावेत. नंतर बेणे सावलीत सुकवावे.

जैविक बेणे प्रक्रिया - ॲझोस्पिरीलम १० ग्रॅम अधिक स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (पीएसबी) १० ग्रॅम आणि व्हॅम २५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. द्रावणात बेणे १० ते १५ मिनिटे बुडवून लगेच लागवडीसाठी वापरावे. अगोदर रासायनिक बेणे प्रक्रिया करून बियाणे सावलीमध्ये दोन ते तीन दिवस सुकवावे. त्यानंतर लागवडीपूर्वी जैविक बीजप्रक्रिया करावी.

खत व्यवस्थापन : सेंद्रिय खताचा जास्तीत जास्त वापर केल्यास उत्पादनवाढीस फायदा होतो. पूर्व मशागतीच्या वेळी हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. माती परीक्षणानुसार हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश द्यावे. लागवडीच्या वेळी स्फुरद आणि पालाशची संपूर्ण मात्रा द्यावा. नत्र २ हप्त्यांत विभागून द्यावे. नत्राचा पहिला हप्ता लागवडीनंतर ४५ दिवसांनी, तर दुसरा हप्ता भरणीच्या वेळी (लागवडीनंतर १०५ दिवसांनी) द्यावा. तसेच भरणीच्या वेळी हेक्टरी दोन टन निंबोळी किंवा करंज पेंडीचा वापर करावा.

पाणी व्यवस्थापन : रेताड जमिनीमध्ये तुषार किंवा ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबकच्या दोन लॅटरलमधील अंतर ४ ते ५ फूट ठेवावे. जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. सतत ओलावा राहिल्याने हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. लागवड एप्रिल-मे महिन्यात होत असल्याने सुरवातीच्या काळात पाऊस पडेपर्यंत पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. कारण मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा हा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. जमिनीप्रमाणे हा कालावधी कमी-जास्त ठेवावा. पावसाळा सुरू झाल्यानंतर पावसाचे पाणी जमिनीमध्ये साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यानंतर हिवाळ्यामध्ये पाण्याच्या दोन पाळीमधील अंतर १२ ते १५ दिवस ठेवावे. मात्र पीक काढणीच्या १५ दिवस अगोदर अजिबात पाणी देऊ नये. पाऊस समाधानकारक असेल तर हलक्या ते मध्यम प्रतिच्या जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात.




### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे 'पेनी ब्लॅक' नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील 'आयफेल टॉवर'चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचलित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या 'युरो टनेल'चे उद्घाटन झाले.
१९९७ : 'बँक ऑफ इंग्लंड'ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष
१९६४ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: ? ? १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकऱ्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया मॉंटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा 'मॉंटेसरी' या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक (जन्म:)
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य (जन्म:)
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.

cmyk



# बीडकरांना महिनाभर नळाला पाणी नाही, व्हॉल्ववर पाणी भरण्याची वेळ

## पालकमंत्री अजित पवारांच्या प्रतिमेला अभ्यंग स्नान लक्ष्यवेधी आंदोलन









बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील जनतेला महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने पाणीबाणी सुरू असुन ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांनी २ वर्षे कालमर्यादा असतानाही ७ वर्षे उलटूनही अद्याप रखडलेल्या अवस्थेत असल्याने कारवाई करण्यात यावी तसेच पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रूपये थकबाकी साठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी. बीडकरांची तहान आणि घशाची कोरड हे लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ठेकेदार जलयोजनेचे मारेकरी आहेत.

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडकरांना वा-यावर सोडले असुन पाण्याअभावी बीडकरांचे हाल होत असुन केवळ बीडच्या पाणीपुरवठ्यासाठी बैठकांचा फार्स होत असुन यांच्या निषेधार्थ आणि बीड शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०५ सोमवार रोजी बीड शहरातील राजीव गांधी चौक परीसरातील नारायणी इंग्लिश स्कूल समोरील व्हाल्ववर ‘‘ पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अभ्यंगस्नान ‘‘ लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शेख मुस्ताक, रामनाथ खोड आणि आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे सहभागी होते. शहरी भागात प्रतिमाणसी प्रतिदिन १३५ लिटर पाणी मिळावे असा दंडक आहे.परंतु बीडकरांना महिन्यांपासून नळाला पाणी नाही.रखरखत्या ऊन्हात सुर्य आग ओकत असताना बीडकरांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते.शहरासाठी बिंदुसरा धरणातुन एक, माजलगाव धरणावरून ‘‘माजलगाव बक वाटर आणि अमृत अटल अशा ३ योजना आहेत.परंतु लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांचे दुर्लक्ष असुन नगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि काम करणाऱ्या मे प्रगती कन्स्ट्रक्शन या ठेकेदार यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे पाणी योजनेचा बोजवारा उडाला असुन ऐन भर उन्हाळ्यात दुरूस्तीच्या कामामुळे अनेक भागात महिनाभरापासून नळाला पाणी नसल्याने पाणीबाणी सुरू आहे बीड शहरासाठी ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांच्या हलगर्जीपणामुळे २ वर्षे कालमर्यादा असताना अद्याप ७ वर्षे उलटूनही रखडलेल्या अवस्थेत आहे.त्यामुळे बीडकरांना तिव्र पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असुन संबंधितांवर कठोर कारवाई करून काम पूर्ण करण्यात यावे.तसेच बीड शहराला नियमित पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रुपये थकबाकीसाठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली.

## थोडक्यात



### श्री. क्षेत्र चाकरवाडी येथे जादा बसेस सोडा-डॉ.संजय तांदळे

बीड। प्रतिनिधी

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ रोप्य महोत्सवी सोहळा दि. ७ जून २०२५ ते १४ जून २०२५ पर्यंत साजरा केला जाणार आहे. यानिमित्त परमपूज्य पंडित श्री प्रदीपजी मिश्रा महाराज( सिहोरवाले) यांची शिव महापुराण कथा होणार आहे.

तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी परायण ज्ञान यज्ञ सोहळा संपन्न होणार आहे .त्यामुळे श्री क्षेत्र चाकरवाडी येथे लाखो भाविक भक्त येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे एस. टी. महामंडळ बीड सह जिल्ह्यातील सर्वच आगारातून चाकरवाडी साठी ज्यादा बसेस सोडण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, नितीन उपाध्ये ,नितीन जायभाय यांनी दि.५ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व एस. टी .महामंडळ चे विभाग नियंत्रक श्रीमती दुसाने मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे .विभाग नियंत्रक श्रीमती दुसाने मॅडम यांच्याशी सविस्तर चर्चा केली असता त्यांनी याबाबत बीड सह जिल्ह्यातील सर्वच बस स्थानकातून चाकरवाडी साठी ज्यादा बसेस उपलब्ध करून देण्यात येतील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

### भागुजीराव ढेकळे कनिष्ठ महाविद्यालयाचा ९८.६१ निकाल

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१% एवढा लागला असून यावर्षी पण या कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून बारावीच्या परीक्षेला २८९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २८५ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शेकडा निकाल ९८.६१% इतका लागला असून विज्ञान व वाणिज्य शाखेचा १००% तर कला शाखेचा ९५.७८% एवढा निकाल लागला. यात विशेष प्राविण्यात ११५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४४, द्वितीय श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, प्रकाश राठोड, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., सर्व कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### जिव्हाळा बेघर निवार केंद्राच्या टीमचा सत्कार

बीड : शहरातील जिव्हाळा बेघर निवरा केंद्रातील रंजल्या गाजल्यांच्या अखंड सेवेबद्दल राज्यस्तरीय पद्मपाणी पुरस्कार जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, यश वंजारे ,काळजीवाहक छाया सरोदे यांना भेटल्याबद्दल दि. ५ मे २०२५ रोजी मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने जिव्हाळा केंद्रामध्ये त्यांचा शाल .सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .यावेळी डॉ.संजय तांदळे, नितीन जायभाये, पोलीस दलाचे एएसआय प्रेमचंद वंजारे सौ. रेखा वंजारे ,तात्याराम वंजारे सह निवारा केंद्रातील लाभार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



## आंबेडकरी विचारांनी ताकद दाखविल्याशिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत :कागदे

बीड। प्रतिनिधी

भसरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपाब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांची नाळ आंबेडकरी चळवळीशी जोडलेली असून रिपाइं कार्यकर्त्यांनी चळवळीशी व आंबेडकरी विचारांशी एकनिष्ठ राहून अनेक आंदोलने केली आहेत. कसलाही राजकिय वारसा नसतांना समाज बांधवावरीत अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सामाजिक न्याय केंद्रिय मंत्री रामदास आठवले देश पातळीवर करीत आहेत. आगामी काळात आंबेडकरी युवकांनी एकत्रित येवून रिपाइंच्या माध्यमातून एकजूट दाखविल्याशिवाय प्रश्न सुटणार नाहीत, आर्थिक दृष्टया मागास असलेल्या समाज बांधवांसमोर अनेक प्रश्न उभा आहेत. आपली ताकद एकजुटीने दाखविली तरच शासनाला आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यास भाग पाडू शकतो, त्यामुळे रिपाइं कार्यकर्त्यांनी कुठल्याही अभिषाला बढ़ी न पडता सर्व ताकदीनिशी एकत्र यावे. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मोरगांव येथील रिपाइं शाखा नामफलकांच्या उदघाटना प्रसंगी केले.पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, आंबेडकरी चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी युवकांचे संघटन व ताकद महत्वाची आहे. युवकांनी रिपाइंच्या माध्यमातून संघटीत होवून आपले प्रश्न मार्गी लावण्यासाठी आंबेडकरी विचारांची ताकद दाखवावी. यावेळी राजु जोगदंड, किसन तांगडे बापू पवार, संतोष जाधव, गोंविद जाधव, अशोक जाधव, संतोष सोनवणे, यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.



### शाखा कार्यकारीणीत निवड

मोरगाव येथील रिपाइं शाखा स्थापनेत अध्यक्ष म्हणून शाम जाधव, उपाध्यक्ष- रणजीत गोरे,सचिव चंद्रकांत थोरात, सल्लागार-सतिष थोरात यांची निवड करण्यात आली आहे.

## परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडलेलेच- अॅड.मनोज संकाये

परळी । प्रतिनिधी

गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम पूर्ण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी प्रशासनाकडे केली होती. १ मे रोजी प्रशासनाला रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु उपजिल्हाधिकारी माननीय अरविंद लाटकर साहेब तसेच परळी पोलीस स्टेशनचे पीआय डोने साहेब यांनी संबंधित अधिकाऱ्यां सोबत दूरध्वनी वरून चर्चा केली परंतु त्या चर्चेचा काही उपयोग झाल्याचे दिसून येत नाही. अधिकारी इतके मग्रूरपणे वागत आहेत की त्यांना प्रशासनातील अधिकारी सांगून सुद्धा त्यांना फरक पडत नाही त्यामुळे आता एक तर काम पूर्ण करा किंवा जनआंदोलन उभारल्याशिवाय पर्याय नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात त्यांनी मित्र मंडळाच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले होते या या निवेदनात त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु प्रशासनाकडून याची दखल घेण्यात आली आणि त्यांना बोलावून आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याची विनंती केली आणि संबंधित अधिकाऱ्यांची त्यांचे बोलणे करून दिले तसेच अधिकारीही बोलले विनंती की चार दिवसाच्या



आत कामास सुरुवात करू असा शब्द त्यांनी दिला होता त्यामुळे त्यांनी प्रशासनाची विनंती मान्य केली व आंदोलन मागे घेतले परंतु कामास सुरुवात झाली नाही. गेल्या आठवड्यात त्या राष्ट्रीय महामार्गावर मोठा अपघात घडला आणि एकास आपले प्राण गमवावे लागले अजून किती जीव घेणार आहेत हे अधिकारी असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे म्हणून लोकांचे हाल होत आहेत तसेच प्रदूषणाचा, शारीरिक विकारांचा त्रास सामान्यांना भोगाव लागतो आहे याकडे प्रशासनाने लक्ष देऊन त्वरित रखडलेल्या कामास सुरुवात करावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

## प्रा.डॉ कल्पना दिपक विधाते यांचा शानदार कौतुक सोहळा

बीड । प्रतिनिधी

डॉ.विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज अहिल्यानगर येथे कार्यरत असणाऱ्या प्रा कल्पना दिपक विधाते ( घाडगे ) यांनी नुकतीच इलेक्ट्रीकल इंडिअरिंग मध्ये सर्वोच्य पदवी डॉक्टरेट प्राप्त केली आहे . त्या निमित्य बीड मध्ये तिचा शानदार सत्कार सोहळा संपन्न झाला . कल्पना विधाते यांचे शालेय शिक्षण संस्कार विद्यालय बीड तसेच महाविदयालयीन शिक्षण स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे झाले .

पदव्युत्तर शिक्षण मॉडर्न कॉलेज पुणे येथे झाले . डॉक्टरेट पदवी ओरिएंटल विद्यापीठ इंदौर येथे प्राप्त केली . डॉ कल्पना विधाते यांच्या कौतुक सोहळ्यात संस्कार प्रबोधिनीचे सचिव अॅड कालीदास थिगळे , उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे , माजी मुअ बी डी कुलकर्णी , झुंजार नेताचे संपादक अजित वरपे यांच्या हस्ते डॉ कल्पना दिपक विधाते यांचा सत्कार संपन्न झाला . या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना अॅड कालीदास थिगळे यांनी डॉ कल्पनाचे कौतुक केले . इंजिनिअरिंग क्षेत्रात डॉक्टरेट मिळवणे ही अत्यंत कठीण व कष्टाची बाब आहे . कल्पनाने तिचे ध्येय साध्य केले ही संस्कार विद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे . डॉ कल्पनाच्या मार्गदर्शनाखाली उत्तम अभियंते घडावेत अशी अपेक्षा व्यक्त केली . या प्रसंगी भाऊसाहेब बोबडे यांनी प्रतिकुल परिस्थितीत कल्पनाने यशाचे शिखर गाठले याबद्दल आनंद व्यक्त केला .

## आठ दिवसांत प्रवेशद्वाराचे काम सुरू करा-होके पाटील

माजलगाव.। प्रतिनिधी



कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शेतकऱ्यांचे कैवारी लोकनेते स्व.दादासाहेब राजवंन यांच्या नावाचे प्रवेशद्वार उभारणीचे काम येत्या आठ दिवसांत सुरू करावे. नसता सर्व राजकीय पक्ष सामाजिक संघटना व सर्व सामान्य माणसांना एकत्र करून प्रवेशद्वार उभे करण्यास बाजार समिती आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही असे समजून. लोकवर्गणीतून स्व. दादासाहेब राजवंन यांचे प्रवेशद्वार उभे करण्यात येईल असा इशारा काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती/ सचिव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

पुढे दिलेल्या निवेदनात ते म्हणाले कि दादासाहेब राजवंन यांनी त्यांच्या कारकिर्दीत शेतकऱ्यांसह सर्व सामान्यांच हित डोळ्यासमोर ठेऊन बाजार समितीसाठी शेकडो एकर जमीन खरेदी करून ठेवली परंतु त्यातील आडत व्यापारी यांना आडत दुकानासाठी काही जमीन लीजवर देऊन उर्वरित जवळपास सर्व जमीनीची आमदार महोदयांच्या मार्गदर्शनाखाली विकास कामांच्या नावाखाली पद्धतशीरपणे विल्हेवाट लावण्याचे काम सभापती व संचालक मंडळाने केले .वास्तविक पाहता जुना मोंढा येथील बाजार समितीचे कार्यालय नवा मोंढा फुले पिंपळगाव याठिकाणी नवीन वास्तूत स्थलांतरित करण्यात आले पण हे सगळं करत असताना ज्यांच्या मुळे या नवीन वास्तूत जाण्याचा व हा सर्व थाटमाट करण्याचा योग आला ते खरे लोकनेते स्व.दादासाहेब राजवंन यांच्या नावाचे प्रवेशद्वार उभारावे या लोकभावनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्षीत करण्याचे काम सन्मानिन आमदार व त्यांच्या बगलबच्याकडून केले गेले. त्यामुळे बाजार समितीचे सभापती यांनी येत्या आठ दिवसांत प्रवेशद्वाराचे काम सुरू करावे अन्यथा लोकवर्गणीतून लोकनेते स्व.दादासाहेब राजवंन यांचे भव्य असे प्रवेशद्वार उभारण्यात येईल असे असा सुचक इशारा काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांनी दिला.

## पाटोदा टपाल कार्यालयाला अतिक्रमणाचा वेढा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील कार्यालयाच्या भोवती अतिक्रमणाचा वेडा पडला आहे. टपाल कार्याचा शोध घ्यावा लागेल अशी परिस्थिती निर्माण झाली. टपाल कार्यालयाच्या बाजूची अतिक्रमणे काढण्यासाठी. उप. डागपलानी पत्र देऊ नये. प्रशासनाने कारवाई केली नाही. प्रशासन अतिक्रमणाविरुद्ध कारवाई करत नसल्याने. अतिक्रमणधारकांना प्रशासनाची फूस आहे का असा प्रश्न निर्माण होत आहे. तालुका टपाल कार्यालय डॉक्टर.बाबासाहेब आंबेडकर चौकात असून. लागूनच पोलीस चौकी आहे. टपाल कारल्याच्या तिन्ही बाजूंनी. अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण केले आहे. अतिक्रमणधारकांनी बांधलेल्या गळ्यामुळे. टपाल कार्यालयाचे अस्तित्व संपुष्टात येत आहे. वयोवृद्ध माणसाला टपाल कार्यालय शहरात आहे का नाही असं वाटत आहे. विशेष




म्हणजे टपाल कार्यालयाचा बोर्ड सुद्धा अतिक्रमण अतिक्रमण धारकांनी झाकून टाकला आहे. पाटोद्याच्या उपडकपालांनी. जिल्हाधिकारी नगरपंचायत मुख्य अधिकारी पोलीस निरीक्षक बीडचे डाक अधिकारी आष्टीचे डाक निरीक्षकांना. अतिक्रमण काढण्यासाठी पत्र दिले आहे जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदार आणि नगरपंचायतीला अतिक्रमण काढण्याचे आदेश देणे. आवश्यक आहे. मात्र पंधरा दिवसाचा कालावधी उलटूनही कारवाई झाली नाही. स्थानिक प्रशासन अतिक्रमणधारकांना पाठीशी घालत असल्याचे चित्र आहे.

## पालकत्व स्वीकारले, आता बाप म्हणून बीड जिल्ह्याकडे लक्ष द्या-रूपाली देशपांडे

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यासाठी प्रजा इथं अन्? राजा तिथं अशी अवस्था झाल्याने बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारलेले राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादांनी आता बाप म्हणून बीड जिल्ह्याकडे लक्ष द्यावे असे रोखठोक मत सामाजिक कार्यकर्त्या तथा लेखिका रूपाली देशपांडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड चे इथे सर्व परीने हाल चालू आहेत. पिण्याला पाणी नाही. दुष्काळ ग्रस्त म्हणून म्हणून आमचे



हाल असेच राहणार का? पाणी नाही, बीड शहराची स्वच्छता कोलमडून पडली आहे. रस्त्यांवर लाईट नाहीत. नगर पालिका झोपलेली आहे. निवेदने दिली तरी ऑफिस च्या टेबलावर कागदाचा गठा जमा होत आहे. पण कसलाच काही ताळमेळ नाही. पाणी नियोजन नाही. पाण्याची सोय व्यवस्थित लावली असती तर आज माझ्या आया बहिणी हंडे घेऊन भटकल्या नसत्या. ग्रामीण भागातील माझ्या बहिणी मैल दर मैल रस्ते तुडवत गेल्या नसत्या. छोटे छोटे लेकरं सुद्धा पाणी मिळविण्यासाठी आज उन्हात उभा राहिले नसते. पिण्याच्या पाण्यापासून ते सांडपाण्यापर्यंत घरातील बाईला नियोजन लावावे लागते. पण बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी असलेल्या अंधारे बाईंकडे नियोजन चा पत्ता नाही. अजितदादा तुम्ही बीडला या. सामान्य लोकांसारखी बीड मध्ये निदान पायी एक चक्कर मारा आणि पहा किती दुर्लक्षित आहे हे बीड. दादा तुम्ही आमच्या बीड जिल्ह्याचे पालक आहात. आमच्यासाठी हि खूप चांगली आनंदाची बाब आहे. आम्ही विश्वास टाकतोय तुमच्यावर. दादा इथे होणारे वाढते गुन्हे, बायकांवर होणारे अत्याचार, अनेक मोठे गुन्हे, वाढत्या आत्महत्या या सर्वांना कुठे तरी आळा बसायलाच हवा. येथील शासकीय आणि प्रशाकीय गोष्टी आता तुम्हीच हाताळा. पालकमंत्री झाल्यापासून दादा तुम्ही एकच चक्कर मारली. बीड जिल्ह्याला न्याय द्या. बीडचा ही विकास होऊ द्या जरा. मागील काही पालकमंत्री, आमदार, खासदार सगळे होऊन गेले. त्यांनी बीडचा विकास होऊ न देता स्वतःचा मात्र भरभक्कम विकास करून घेतला. विकास केला असता तर आज आम्ही पाण्यासाठी, मूलभूत गरजा भागविण्यासाठी वणवण हिंडलो नसतो. दादा आता तुम्हीच आम्हा बीड जिल्हावासियांना न्याय द्या. बीडच्या विकासाचे पारडे जड करा असे भावनिक आवाहन ही रूपाली देशपांडे यांनी पालकमंत्र्यांना केले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
मंगळवार, दि.६ मे २०२५


# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार जलरथाचे उद्घाटन

## शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी गावांनी पुढे यावे-जिल्हाधिकारी जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**


**गाळयुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या कार्यक्रमाचा जिल्ह्यातील गावांनी पुढे येवून लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जलरथाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केले.**

गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण हि योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या योजनेचा प्रचार प्रसार करण्याचे काम भारतीय जैन संघटना करीत आहे. या योजनेच्या प्रचार रथाचे उद्घाटन आज दिनांक ५ मे रोजी जिल्हाधिकारी श्री. विवेकजी जॉन्सन व अप्पर जिल्हाधिकारी श्री हरिष धार्मिक यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे पार पडले यावेळी उपस्थित जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री संजय आमले, सहाय्यक जलसंधारण अधिकारी श्री शुभम हासबे, जलसंधारण अधिकारी सचिन ठोंबरे सर्व मृद् व जलसंधारण विभाग बीड तसेच भारतीय जैन संघटनेचे सकल जैन समाज अध्यक्ष प्रेमचंदजी लोढा, समाजरत्न विजयराज बंब भाजपा शहराध्यक्ष अशोक लोढा, जिल्हा अध्यक्ष अमित पगारिया, जिल्हा सचिव सुशील मुनोत, जिल्हा उपाध्यक्ष राजु संचेती, बाबुशेठ खिवंसरा, राजेंद्र मुनोत, गौतम खटोड, आशिष जैन, प्रविण बोरा, मदन दुग्गड, सुशील खटोड, सचिन लोढा, सचिन कांकरिया, निलेश ललवाणी, आनंद ललवाणी, अक्षय लोढा जिल्हा समन्वयक जयराम शिंदे आदी.

महाराष्ट्र शासनाच्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या महत्वाकांक्षी योजनेचे राज्यात युद्धपातळीवर काम सुरू झाले आहे. प्रत्येक गावागावात जाऊन या योजनेचा जलरथद्वारे प्रचार-प्रसार तथा जनजागृती केली जात आहे. या जलरथांना



राज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हा, तालुका पातळीवर मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. जिल्हाधिकारी, झेडपी सीईओ, जलसंधारण अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली सरपंच, ग्रामसेवक, शेतकरी यांना ऑडिओ, व्हिडिओ, पीपीटी सादरीकरण या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जात आहे. आतापर्यंत या योजनेचा प्रचार-प्रसार करणार्या जलरथाचे उद्घाटन राज्यातील २३ जिल्ह्यात संपन्न झाले. यात अहिल्यानगर, अकोला, भंडारा, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जळगाव, जालना, नंदुरबार, सांगली, सातारा, सोलापूर, वाशिम, यवतमाळ, धुळे, वर्धा, अमरावती, धाराशीव, गडचिरोली, लातूर, गोंदिया, कोल्हापूर, नागपूर आदी जिल्ह्यांचा समावेश आहे.'योजनेची सर्व माहिती तसेच अर्ज करण्यासाठी 'गाळमुक्त धरण' म्हणजेच '..' या शासनाच्या पोर्टलला भेट द्यावी. डिमांड जनरेशनया टॅबवरुनमागणी अर्जडाउनलोड करून भरलेला अर्ज'बीजेएस ॲप'वर अपलोड करावा. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा,' असे आवाहन मृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच सचिव गणेश पाटील यांनी केले आहे.सदरील योजनेद्वारे शासन गावागावांतील तलावांमधील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणार आहे. गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे.शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकर्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच 'गाळमुक्त धरण' पोर्टलची निर्मिती करण्यासाठी भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकर्यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करीत आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे.



**पाटोदा येथील लोकसेवा हास्पेटल डॉ.मोहम्मदखान पठाण यांचा आज दि.५ सोमवार रोजी शेख मुसा सर (मुख्याध्यापक भगवान विद्यालय बीड) यांची कन्या डॉ.सना शेख यांच्या सोबत किंगस पलेस येथे लग्न संपन्न झाले.यावेळी एमआयएम जिल्हाध्यक्ष अड शेख शफीक भाऊ, नगरसेवक शेख आसेफ सौदागर,शेख समीर (ग्रामपंचायत सदस्य लिंबागणेश) पत्रकार हमीदखान पठाण,शेख बशीर भाई ,शेख जहीर भाई (कंडक्टर), मोहसिनखान पठाण (बीड पोलीस), सह इतर मान्यवरांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.**

## गजानन विद्यालयाचा बारावीचा निकाल ९८.७०%

नवगण राजुरी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छ. संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून नवगण राजुरी येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.७०% एवढा लागला असून यावर्षी पण कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा वाणिज्य शाखेचा निकाल १००%, विज्ञान शाखेचा ९९.८०%, व्यवसाय अभ्यासक्रमाचा ९५.४५% तर कला शाखेचा ९४.२१% एकूण निकाल ९८.७०% इतका लागला असून विज्ञान शाखेतून गुणानुक्रमे प्रथम कु.कागदे सृष्टी अण्णासाहेब, कु. ठेंगल सोनम रामदास ९२.६७%, व्दितीय राऊत सिद्धांत दत्तात्रय ९२.३३%, तृतीय कु.चाळक संध्या बाळासाहेब ९२.००%, कला शाखेतून प्रथम कु. भालेराव प्रतिभा बिभिषण ८४.८३%, द्वितीय कु.सय्यद दिलशाद शौकत ७८.३३%, तृतीय कु.काळे ममता

पान ३ वर

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या बारावीच्या परीक्षेत निकालाची उज्वल परंपरा कायम

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाला असुन सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ९७.२९ टक्के, कला शाखेचा ६७.१७ टक्के, वाणिज्य शाखेचा ९२.९४ टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ६६.२९ टक्के निकाल लागला आहे. बारावीच्या परीक्षेत सुंदराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम नायबळ अनुप शरद(९०.६७ %), द्वितीय झरेकर दिग्विजय सुरेश (८९.८३% ), तृतीय मुंदडा रोहन संदीप व रुद्रवार ओजस्वीनी सचिन (८७.५० %), कला शाखातुन प्रथम भडके राणी माणिकराव (८१.५० %),द्वितीय बोचरे योगिता दत्तात्रय (७७.६७ %),तृतीय राऊत शुभांगी कारभारी (७६.३२%)

वाणिज्य शाखा: प्रथम कुरे अंजली प्रल्हाद (८७.५०%), द्वितीय शेजुळ धनश्री उद्धवराव (८६.१७%), तृतीय राऊत पायल सचिन व कोळपे धनश्री शंकर (८१%) तर व्यावसायिक अभ्यासक्रम: प्रथम कापसे ऋतुजा मधुकर (७५.५०%), द्वितीय पौळ साक्षी सुदाम (७२.३३% ), तृतीय रावले पूजा महादेव (७०.६७%) यांनी यश संपादन केले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ऍड.भानुदासराव डक,माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल.चव्हाण,प्राचार्य डॉ.जी. के.सानप, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे प्रा.स्वप्निल टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधिक्षक सतीश एरंडे यांनी अभिनंदन केले.

## मुलींना स्वातंत्र्य दिल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल- ॲड.माधुरी क्षीरसागर

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

मुलींना स्वातंत्र्य दिले आणि जबाबदारीची जाणीव दिली तर त्या मुली आत्मविश्वासाने समाजात वावरतात.

असे मत परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्या ॲड.माधुरी क्षीरसागर यांनी केले.

येथील योगेश्वरी शिक्षण संचालित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीरात किशोरवयीन मुले व मुली यांच्यासमोरील आव्हाने या विषयावर बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, निर्णयप्रक्रियेमध्ये महिलांना दुय्यम स्थान असते स्त्री समानतेचे कायदे असले तरी समाजव्यवस्था त्यासाठी आजही पोषक नाही. मुलांमधली पुरुषप्रधान मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न होताना दिसत नाहीत. येणाऱ्या काळात संस्थेने मुलांसाठीसुद्धा असे संस्कार शिबीर ठेवण्याची गरज आहे मुलींनी आपले अवांतर वाचन वाढवून आपले आयुष्य समृद्ध केले पाहिजे. स्वतंत्र विचार करणाऱ्या मुलींमध्ये समाजव्यवस्था बदलण्याची ताकद असते. मुलींनी मैदानी खेळावेत चांगल्या गोष्टीसाठी कुटुंबासोबत संघर्ष करायला मुलींनी तयार राहिले पाहिजे. अध्यक्षीय समारोपात ॲड.कल्याणी विर्धे यांनी सांगितले की, मुलींकडे आत्मविश्वास असावा आणि कुठल्याही संकटावर मात करण्याची जिद्द असली पाहिजे, असा आशावाद व्यक्त करून वाचनाने सकारात्मक ऊर्जा येते, त्यामुळे आपले वाचनाची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे संचालन कु. वैष्णवी नेहरकर यांनी केले तर आभार प्रा. वैष्णवी खाडे यांनी मानले.

याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास, सचिव कमलाकर चौसाळकर,क्रीडा प्रबोधिनी मार्गदर्शक रमण सोनवळकर, योगेश्वरी महाविद्यालयाचे प्रभारी तथा योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. एन.के.गोळेगावकर, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ सल्लागार प्रा. माणिकराव लोमटे, योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर, समन्वयक प्रा.डॉ. प्रवीण

पान ३ वर

## प्रा. डॉ.कल्पना विधाते यांचा शानदार कौतुक सोहळा

बीड । प्रतिनिधी

डॉ विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज अहिल्या नगर येथे कार्यरत असणाऱ्या प्रा. कल्पना दिपक विधाते ( घाडगे ) यांनी नुकतीच इलेक्ट्रीकल इंडिअरिंगमध्ये सर्वोच्य पदवी डॉक्टरेट प्राप्त केली आहे . त्या निमित्य बीड मध्ये तिचा शानदार सत्कार सोहळा संपन्न झाला . कल्पना विधाते यांचे शालेय शिक्षण संस्कार विद्यालय बीड तसेच महाविदयालयीन शिक्षण स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे झाले .



पदव्युत्तर शिक्षण मॉडर्न कॉलेज पुणे येथे झाले . डॉक्टरेट पदवी ओरिएंटल विद्यापीठ इंदौर येथे प्राप्त केली . डॉ कल्पना विधाते यांच्या कौतुक सोहळ्यात संस्कार प्रबोधिनीचे सचिव ॲड कालीदास थिगळे , उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे , माजी मुअ बी डी कुलकर्णी , झुंजार नेताचे संपादक अजित वरपे यांच्या हस्ते डॉ कल्पना दिपक विधाते यांचा सत्कार संपन्न झाला. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना ॲड कालीदास थिगळे यांनी डॉ कल्पनाचे कौतुक केले. इंजिनिअरिंग क्षेत्रात डॉक्टरेट मिळवणे ही अत्यंत कठीण व कष्टाची बाब आहे. कल्पनाने तिचे ध्येय साध्य केले ही संस्कार विद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. डॉ कल्पनाच्या मार्गदर्शनाखाली उत्तम अभियंते घडावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी भाऊसाहेब बोबडे यांनी प्रतिकुल परिस्थितीत कल्पनाने यशाचे शिखर गाठले याबद्दल आनंद व्यक्त केला. डॉ कल्पना विधाते यांनी त्यांच्या मनोगतात संस्कार विद्यालयाचा त्यांच्या जडण घडणीत सिंहाचा वाटा आहे. संस्कारच्या सर्व शिक्षकवृंदाप्रति ऋण व्यक्त केले. या प्रसंगी डॉ दिपक विधाते यांचे ही

पान ३ वर

## बारावी परीक्षेत मोनिका सिरसाट प्रथम!

बीड । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या अंथरवन पिंपरी तांडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेची विद्यार्थिनी मोनिका राजेभाऊ सिरसाट हिने इयत्ता १२ वी (कला शाखा) परीक्षेत ८२.१७ टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन करून माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल तिचे आईवडील, कॉलेज प्रशासन, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी अभिनंदन केले आहे.



माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील रहिवासी असणारे अशिक्षित परंतु मोठं कुटुंब या मोठ्या कुटुंबात गरिबी परिस्थिती असतानाही खचून न जाता दिवस-रात्र काबाडकष्ट मेहनत करून आपल्या लाडक्या सात ही कन्यांचे शिक्षण आणि त्यांचे यशस्वी संगोपन, विवाह करणाऱ्या राजाभाऊ सिरसाट आणि त्यांच्या पत्नी सौ. लता सिरसाट या दांम्पत्याने आपल्या सातही मुलींना उच्च शिक्षण दिले. काही मुलींचे विवाह करून त्यांचा सुखाचा संसार सुरू करून दिला. सातव्या क्रमांकाची मुलगी कु. मोनिका हिला विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा होता. परंतु परिस्थितीमुळे तिला विज्ञान शाखेला प्रवेश घेता आला नाही. दरम्यान तिने कला शाखेत प्रवेश घेऊन परिस्थितीवर मात करून हलाकीच्या परिस्थितीत प्रचंड अभ्यास करून परिस्थितीवर मात केली. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेमध्ये मोनिका सिरसाट हिने ८२.१७ टक्के गुण संपादित करून

पान ३ वर

## शेतकऱ्याचा मुलगा झाला एम.बी.बी.एस डॉक्टर

माजलगाव । प्रतिनिधी

अनेकजण परिस्थितीचे भांडवल करतात. पुढे जायचे होते. परंतु पैसा नव्हता, परिस्थिती नव्हती. अशी कारणे अनेकजण सांगतात. परंतु पुढे जाण्यासाठी, यश मिळविण्यासाठी, स्वप्न साकार करण्यासाठी परिस्थिती, गरिबी, पैसा कधीही आड येत नाही. परिस्थिती कशीही असो, ती बदलता येते, परिश्रम आणि गुणवत्तेने,हेच एका छोट्याशा गावातील शेतकऱ्याच्या मुलाने दाखवून दिले आहे. अथक परिश्रमाने शेतकऱ्याच्या मुलाने गावातील पहिला एमबीबीएस





डॉक्टर होण्याचा मान ऋषिकेशने मिळविला आहे.

ही यशोगाथा आहे, माजलगाव तालुक्यातील छोटेवाडी येथील ऋषिकेश बागल याचे वडील सुरेश बागल हे शेतकरी. त्यांना चार मुली एक मुलगा. आई सौ.चऊत्रा हया गृहिणी.घरी शेती शेतीत होणारे उत्पन्न,मुलांचे शिक्षण,कुटुंबाचा उदरनिर्वाह.त्यात शेतीत होणारी नापिकी,नैसर्गिक आपत्ती अशी परिस्थिती असतानाही सुरेश बागल यांनी शेती करून मुलांना शिक्षण दिले. परिस्थितीशी दोन हात करीत,त्यांनी ऋषिकेशला डॉक्टर करण्यासाठी परिश्रम घेतले.ऋषिकेशने सुद्धा त्यांचे परिश्रम, जिद्द सार्थकी ठरविली. मुलगा डॉक्टर झाल्याने, आईवडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.ऋषिकेश गावातील पहिला एमबीबीएस डॉक्टर झाला. ऋषिकेशचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माजलगांव विद्यालयात तर महाविद्यालयीन शिक्षण सिदधेश्वर महाविद्यालयात व पदवीपर्यंतचे वैद्यकीय शिक्षण प्रकाश इंस्टीट्यूट ऑफ मेडिकल सायन्स एंड रिसर्च उरुन-इस्लामपूर,सांगली येथे झाले. ऋषिकेशने जिद्द व कठोर परिश्रमाने एमबीबीएसची पदवी घेऊन परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. त्याने इंग्रजी विषय घेऊन पदवी संपादन केली.

ऋषिकेशने पहिल्याच प्रयत्नात एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण केली. त्याने शेतकरी आई-वडिलांचे स्वप्न साकार करीत छोटेवाडी( रामगावच्या) शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

पान ३ वर

# स्कॉलरशिप परीक्षेत संकल्प विद्या मंदिर शाळेचे यश!

## श्रेया चाटे, सोहम चव्हाण, श्रेयस पौळ, श्रावणी कागणे व अथर्व चाटे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील शिक्षण क्षेत्रामध्ये संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेबरोबर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. याचे कारण म्हणजे या शाळेत शालेयस्तरावर विविध स्पर्धा परीक्षा राबविल्या जातात. त्यापैकीच एक असलेल्या स्कॉलरशिप टॅलेंट सर्च एक्झामचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी ठरलेल्या संकल्पचे विद्यार्थी विभागस्तरावर शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

संकल्प विद्या मंदिर शाळेचे कु.श्रेया श्रीकांत चाटे स्कॉलरशिप टॅलेंट सर्च परीक्षेची तसेच चि.सोहम सचिन चव्हाण यास गव्हर्नमेंट व कॉलरशिप टॅलेंट सर्चची स्कॉलरशिप व चि.श्रेयस माधव पौळ, कु.श्रावणी ओमप्रकाश कागणे आणि चि.अथर्व अशोक चाटे हे विद्यार्थी उत्कृष्ट गुण संपादित करून गव्हर्नमेंट शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. तर गुणवत्ता यादीमध्ये शाळेच्या





तब्बल ५० विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे. तर चि.स्वरूप गणेश लाड या विद्यार्थ्याने १५० पैकी १२८ गुण घेऊन स्कॉलर स्टुडन्ट अवॉर्ड पटकावला आहे. कु.भक्ती अरविंद मोरे (१५० पैकी १०२), कु.आदिती किशन गित्ते (१५० पैकी १०८), कु.शरयू कैलास चोले (१५० पैकी १०८), कु.श्रावणी किशोर इंगळे (१५० पैकी १०८), चि.श्रीनिवास चंद्रकांत कुलथे (१५० पैकी ११२), चि.रूजूल राहुल इंगळे (२०० पैकी १४०), कु.भूमिका बिजयसिंग भाबरदोडे (२०० पैकी १४६), कु.कुमुदिनी कैलास काळे (२०० पैकी १४२), कु.प्रांजल व्यंकटेश मोरे (२०० पैकी १३६) या विद्यार्थ्यांनी गुण प्राप्त करून गोल्ड मेडल प्राप्त केले आहे. तसेच १८ विद्यार्थ्यांनी सिल्व्हर मेडल तर २० विद्यार्थ्यांनी ब्राँझ मेडल प्राप्त केले आहे. वरील विद्यार्थ्यांनी स्कॉलर स्टुडन्ट अवॉर्ड व विविध मेडल्स घेऊन अंबाजोगाई शहरासह शाळेचे आणि कुटुंबाचे नांव उज्वल केल्याबद्दल शाळेचे कार्यवाह प्रा.कैलास भागवत चोले, मुख्याध्यापिका श्रीमती आर.एस.बडे, स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख, शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दोन अज्ञात महिलांची धाडसी चोरी, सोने खरेदीचा बहाणा करत मारला डल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा गावात अवधूत ज्वेलर्समध्ये दोन अज्ञात महिलांनी धाडसी चोरी केल्याची घटना घडली आहे. ३२,००० रुपयांचे सोन्याचे इरिंग (कानातील रिंग) लंपास केले आहेत. भर दुपारी ही चोरीची घटना घडली आहे. दरम्यान, ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून, अज्ञात महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



एका सराफा दुकानात दोन अज्ञात महिलांनी खरेदीच्या बहाण्याने प्रवेश करत ३२,००० रुपयांची सोन्याचे कानातील रिंग चोरल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून शिरूर पोलिसांनी अज्ञात महिला चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे. फिर्यादी अमोल कचरु दहिवाळ यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. दहीवाळ हे त्यांच्या अवधूत ज्वेलर्स या दुकानात नेहमीप्रमाणे व्यवहार करत होते. दुपारी साधारण ४.३० ते ४.४५ च्या दरम्यान दोन अनोळखी महिला त्यांच्या दुकानात आल्या. सोन्याची कानातील रिंग पाहण्याच्या बहाण्याने त्यांनी दहिवाळ व त्यांच्या भावाकडून वेगवेगळी दागिने दाखवण्याची मागणी केली. दुकानातील गर्दीचा आणि त्यांच्या गाफीलपणाचा फायदा घेत या महिलांनी ४ ग्रॅम २०० मिली वजनाची, सुमारे ३२,००० रुपये किमतीची कलकत्ता ए प्रकाराची सोन्याची कानातील रिंग लबाडीने चोरुन नेली.

दरम्यान, या अज्ञात महिलांनी चोरी केलेली घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. तसेच त्यांच्या विरोधात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे चोरी करणाऱ्या महिलांचा तपास करणं सोपं जाणार आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास शिरुर पोलिस करत आहेत. दरम्यान, राज्याच्या विविध भागात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. अनेक ठिकाणी भरदिवसा चोरी होत आहे. यामध्ये अनेक ठिकाणी घरफोडी, दुचाकी चोरी आणि इतर चोरीच्या घटना घडत आहेत, ज्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. पोलिसांनी या घटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत, पण अजूनही चोऱ्या थांबलेल्या नाहीत. दरम्यान, या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन देखील सतर्क झालं आहे. अशा घटना होऊ नये म्हणून उपापयोजना केल्या जात आहे. रात्रीच्या वेळेस देखील पोलिसांच्या गाड्या फिरत आहे. दरम्यान, अशा चोरीच्या घटनांमध्ये सापडलेल्या चोरांवर मग ती महिला असो की पुरुष त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे

# राष्ट्रीय महिला शेतकरी संमेलनाचे आयोजन; पुण्यात न्याय्य हक्कांसाठी तीन दिवसीय राष्ट्रीय संमेलन

**पुणे । प्रतिनिधी**

भारतातील शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि अन्नसुरक्षेच्या आधारस्तंभ असलेल्या महिला शेतकऱ्यांच्या योगदानाला अखेर राष्ट्रीय स्तरावर आवाज मिळणार आहे.

विविध सामाजिक बंधने आणि सरकारी धोरणांमधील दुर्लक्षामुळे पिचलेल्या महिला शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी महिला किसान अधिकार मंच (मकाम) येत्या ७ ते ९ मे २०२५ दरम्यान पुण्यात तीन दिवसीय राष्ट्रीय महिला शेतकरी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रात हे संमेलन होणार आहे.



भारतातील ८५ टक्क्यांहून अधिक ग्रामीण महिला शेतीत सक्रिय आहेत, परंतु भूमी मालकीच्या बाबतीत त्यांची संख्या केवळ १४ टक्क्यांच्या आसपास आहे. शेतीत त्यांचे प्रचंड योगदान असूनही, त्यांना 'शेतकरी' म्हणून योग्य मान्यता आणि सरकारी पाठबळ मिळत नाही. पुरुष इतर क्षेत्रांकडे वळत असताना, महिला आजही शेतीत खंबीरपणे उभ्या आहेत. या संमेलनात, देशभरातील महिला शेतकरी त्यांच्या अनुभवांच्या आधारावर धोरणांमध्ये आपली भूमिका अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी हा मेळावा होणार आहे. देशभरातील ५०० हून अधिक महिला शेतकरी, विविध शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील शिक्षणतज्ज्ञ या संमेलनात सहभागी होणार आहेत. जमीन हक्क, स्थलांतर, शेती मजुरी, पशुपालन, मत्स्यपालन, बियाणे आणि जंगल उत्पादने यांसारख्या महत्वाच्या विषयांवर समांतर चर्चा सत्रे होणार असून संमेलनात बियाणे, विविध शेती उत्पादने, माहितीपूर्ण पोस्टर्स आणि प्रकाशनांचे प्रदर्शन भरवले जाईल. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे.

# कचरा जाळण्याच्या तक्रारींचे निवारण करा; पुणे एअर ॲक्शन हबची महापालिकेकडे तक्रार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे एअर ॲक्शन हबने महापालिका प्रशासनाकडे कचरा जाळण्याच्या तक्रारींचे निवारण सुधारण्याची मागणी करणारी तक्रार केली आहे.अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज मीना यांना कचरा जाळण्याच्या तक्रारींचे निवारण अधिक चांगल्या प्रकारे कशी करावी याच्या उपायोजना देत सुमारे तेराशे नागरिकांची स्वाक्षरी असणारी तक्रार केली आहे.



पुणे ॲक्शन हबने वर्षभर अभ्यास करुन महापालिकेला शहरातील सर्वंच भागात कचऱ्याची समस्या कशी बिकट बनली आहे. याचा लेखा जोखा दिला आहे. यात म्हटले आहे की,कचरा जाळण्याच्या तक्रारींना तातडीचा प्रतिसाद मिळत नाही. आग विझल्यानंतर खूप उशिरा प्रतिसाद मिळतो, ज्यामुळे कोणत्याही प्रतिबंधात्मक कारवाईची व्याप्ती कमी होते. तक्रारी करण्यासाठी अनेक माध्यमे उपलब्ध असली तरी या तक्रारींचे वेळेवर आणि समाधानकारक निराकरण झालेले दिसून आलेले नाही. कचरा जाळण्याच्या सततच्या समस्येला तोंड देण्यासाठी महापालिकेला युध्द पातळीवर प्रयत्न वाढवावे लागतील. अलीकडेच मोबाईल पथके सुरू करण्यात आली आहेत, परंतु त्यांच्या कामगिरीतही काही तृटी आहेत.त्यासाठी आम्ही हा तक्रार अर्ज केला आहे.

# निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीला जनतेच्या अडचणी समजल्या पाहिजेत; आमदार सुनील शेळके यांचा 'जनता दरबार'

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

जनतेशी थेट संवाद आणि त्यांच्या अडचणींचे त्वरित निराकरण हेच खरे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन मावळचे आमदार सुनील शेळके यांनी केले आहे. आमदार सुनील शेळके यांचा जनता दरबार उपक्रम पार पडवा आहे. यासाठी मतदारसंघातील नागरिकांच्या भरघोस उपस्थिती लावल्यामुळे हा यशस्वी उपक्रम ठरला आहे.

वडगाव मावळ येथील शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात आमदार सुनील शेळके यांचा जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. या जनता दरबारात आमदार सुनील शेळके यांनी विविध समस्या घेऊन आलेल्या नागरिकांचे सविस्तर



ऐकून घेतले. मागील साडेपाच वर्षांप्रमाणे दर सोमवारी होणाऱ्या जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रलंबित शासकीय कामे, शैक्षणिक व आरोग्य विषयक अडचणी, योजनांचा लाभ, रस्ते, पाणी आणि इतर नागरी सुविधा यासंबंधी अनेक तक्रारी व सूचना नागरिकांनी मांडल्या.

दरबारात राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष दीपाली गराडे, दीपक हुलावळे, साहेबराव कारके, काळूराम मालपोटे, पंढरीनाथ ढोरे, नारायण ठाकर, नारायण भालेराव, भरत येवले, सुहास गरुड, चंद्रकांत दाभाडे आणि किशोर सातकर हे पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या तक्रारींची नोंद घेत यावेळी बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले, आपल्याकडून निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीला जनतेच्या अडचणी समजल्या पाहिजेत. त्या ऐकून घेऊन तत्काळ निर्णय घेणे आणि प्रशासनाला कामासाठी भाग पाडणे, हीच खरी जबाबदारी आहे. जनता दरबार उपक्रमातून लोकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते, त्यातूनच परिवर्तनाची दिशा ठरते.

वडगाव व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अडचणी मांडल्यामुळे जनता दरबाराला पुन्हा एकदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आमदार शेळके यांच्या कार्यपद्धतीमुळे मावळ तालुक्यात लोकांमध्ये विश्वास व समाधान व्यक्त होत आहे.

# चोरट्यांच्या मारहाणीत ज्येष्ठ महिला जखमी; रोख रकमेसह २ लाखांचा ऐवज लंपास

**आळेफाटा । प्रतिनिधी**

आळे (ता. जुन्नर) येथे चोरट्यांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवून ७२ वर्षीय वृद्ध महिलेस मारहाण करत ४७ हजार रुपये, सोन्याचे दागिने व मोबाईल असा एकूण २ लाख रुपयांचा ऐवज लुटून नेला. चोरट्यांना प्रतिकार करताना या वृद्ध महिला जखमी झाल्या आहेत. ही घटना सोमवारी (दि. ५) पहाटे घडली. शुभदा दिलीप धोंगडे असे जखमी वृद्ध महिलेचे नाव असून याबाबत आळेफाटा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, आळे गावठाण परिसरात मुंजोबा मंदिरासमोर दुकानात राहणाऱ्या शुभदा दिलीप धोंगडे यांचे दुकानाचे शटर्स अज्ञात चोरट्याने वर करून आतमध्ये प्रवेश केला. यानंतर हातातील धारदार शास्त्राचा धाक दाखवत त्यांच्या कपाटातील ४७ हजार रुपये व त्यांचे अंगावरील पावणेदोन तोळ्याचे सोन्याचे मनी मंगळसूत्र व हार असा एक मोबाईल घेऊन असा दीड लाख रूपयांचा ऐवज लुटून पोबारा केला. यावेळेस शुभदा धोंगडे यांनी चोरट्यांना प्रतिकार केला या घटनेत त्यांचे डोळ्यास व हाताला मोठी जखम झाली. अशा अवस्थेत त्यांनी आरडाओरड केली. यानंतर त्यांना आळे प्राथमिक आरोग्य केंद्रात व नंतर आळेफाटा येथील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेने आळे गावठाण्यात घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळतात आळेफाटा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. दुपारनंतर ठसे तज्ज्ञांनाही येथे पाचारण करण्यात आले होते. शुभदा धोंगडे यांच्य फिर्यादीवरून पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिनेश तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पिंपरी सांडस येथील बनावट विसार पावती प्रकरणी ३ जणांवर गुन्हा दाखल

**वाघोली । प्रतिनिधी**

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपरी सांडस येथील गट नंबर ४०५ मधील मिळकती संदर्भात बनावट विसार पावती संदर्भात फिर्यादी विशाल गौतम बोरा (राहणार बाणेर पुणे) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. मात्र या प्रकरणात आरोपींनी पोलिसांसह इतरांवर गंभीर आरोप करत पोलीस आयुक्तांकडे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि.१९/०४/२०२० रोजी ते दि. १३/०४/२०२५ रोजी दरम्यान मौजे पिंपरी सांडस येथील गट नंबर ४०५ मधील फिर्यादीचे वडील नामे कै. गौतम बोरा यांचे नावे असलेली ६४ आर व माझे नावे असलेली १ हेक्टर २० आर आर व १७ आर पोट खराबा अशी एकूण २ हेक्टर १ आर मिळकत आरोपींनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी व सदरची मिळकत बळकाविण्याच्या इराद्याने बनावट विसार पावती तयार करुन त्या आधारे वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन फसवणूक केल्याप्रकरणी सुमित प्रल्हाद कोतवाल, रा. आष्टापुर, ता. हवेली, जि. पुणे,अमोल नंदकुमार गोते, रा. शिरवसडी, गोतेमळा, ता. हवेली, जि. पुणे,अक्षय दत्तात्रय यादव, रा. यादववस्ती, शिंदेवाडी, ता. हवेली, जि. पुणे यांच्याविरुद्ध लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिवाणी स्वरूपाची बाब ?

दिवाणी स्वरूपाची बाब असताना फौजदारी स्वरूपाची दाखवून जमीन बळकावण्याच्या, ताबा घेण्याच्या उद्देशाने कोणतीही शहानिशा न करता खोटे गुन्हे दाखल केल्याने पोलीस अधिकारी व इतर यांची चौकशी करण्याची मागणी आरोपींनी पोलिस आयुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शन रांगेत चोरी; दागिने चोरणाऱ्या दोघी गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरातील दर्शन रांगेत महिला भाविकांकडील दागिने चोरणाऱ्या दोघींना विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. माधुरी संतोष डुकरे-घाडगे (वय ३०), काव्या तनवीर जाधव (वय २१, दोघी रा. यवत रेल्वे फाटकाजवळ, यवत, ता. दौंड, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला इंदापूर तालुक्तातील विठ्ठलवाडीतील रहिवासी आहेत. रविवारी (४ एप्रिल) दुपारी तीनच्या सुमारास त्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शनासाठी आल्या होत्या. त्या लहान मुलीला घेऊन दर्शन रांगेत थांबल्या होत्या. त्या वेळी आरोपी माधुरी आणि काव्या हिने तक्रारदार महिलेच्या मुलीच्या गळ्यातील ४० हजारांचे सोनसाखळी चोरुन नेली. महिलेच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर तिने आरडाओरडा केला. दर्शनरांगेतील भाविकांनी माधुरी आणि काव्या यांना पकडले. पकडून सुरक्षारक्षकांच्या ताब्यात दिले. पोलीस कर्मचारी काटे तपास करत आहेत. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे.यापूर्वी मंदिरात अशा अनेक घटना घडल्या आहेत. चोरी करणाऱ्या याच महिला वारंवार मंदिर परिसरात फिरत असतात मंदिर प्रशासनाचे ही लक्ष या महिलांकडे गेलं नाही का असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

# खेडला अर्थसंकल्पात निधी नाही; दिलीप मोहिते पाटील यांचा आरोप

**खेड । प्रतिनिधी**

यंदाच्या अर्थसंकल्पात खेड तालुक्याला एक पैसाही निधी मिळाला नाही, असा आरोप माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केला आहे. सध्याचे आमदार बाबाजी काळे यांच्यावर घणाघाती टीका करताना, 'ते जनतेची दिशाभूल करीत असून, आपल्या काळात मंजूर झालेल्या कामांचे श्रेय घेत आहेत,' असे मोहिते म्हणाले.

'खेड तालुक्याला काय मिळाले? आमदार काळे यांनी अर्थसंकल्पात काय मांडले? ते आमच्या कामांचे श्रेय घेतात. पण, नवीन काहीच करीत नाहीत,' असे मोहिते यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. आमदार बाबाजी काळे यांनी महाराष्ट्रदिनी ध्वजारोहणानंतर



सांगितले होते की, प्रशासकीय इमारतीसाठी ३८ कोटींचा निधी मिळाला असून, लवकरच कामाला सुरुवात होईल, असे सांगितले. त्याला मोहिते यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, सर्व कार्यालये एकाच ठिकाणी असावीत, यासाठी आपण प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव मांडला होता.

पंचायत समितीच्या जागेत ही इमारत बांधण्याचे ठरले होते. पण, विरोधकांनी अडथळा आणला. अखेर सध्याच्या पंचायत समितीच्या जागेत इमारत बांधण्याचे निश्चित झाले. २०२१ मध्ये याचे टेंडर निघाले, वर्कऑर्डरही झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजनही झाले. मात्र, निवडणुकीत अपयश आले आणि आता काळे माझ्या कामांचे श्रेय घेत आहेत, असे मोहिते यांनी स्पष्ट केले.

मोहिते यांनी काळे यांच्यावर निवडणुकीतील आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप केला. 'निवडणुकीत दिलेली आश्वासने कधी पूर्ण करणार? ५२ हजार मतांनी विजय मिळाला म्हणजे विकास होतो का? तालुक्याच्या विकासासाठी ठोस कामे करा, दुसर्यावर टीका करून काही होत नाही,' असे मोहिते यांनी सांगितले.

# बारामतीतील उद्योजकांसाठी दिल्ली येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनतर्फे उद्योजकांसाठी १३ ते १७ मे २०२५ दरम्यान नवी दिल्लीतील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित इंडिया मशीन टूल्स शो प्रदर्शन पाहण्यासाठी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष धनंजय जामदार यांनी दिली.

देशाची राजधानी दिल्लीत देश विदेशातील अत्याधुनिक मशीनरीचे उत्पादक त्यांचे विविध उत्पादने वेळोवेळी प्रदर्शित करत असतात. या प्रदर्शनात देश-विदेशातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त लहान-मोठ्या मशिनरींचे प्रदर्शन होणार आहे. देशातील नामांकित आणि परदेशी कंपन्या सहभागी होणार असल्याने उद्योजकांना जागतिक दर्जाच्या यंत्रसामग्री पाहण्याची संधी मिळेल.

BIDA
BARAMATI INDUSTRIAL DEVELOPMENT ASSOCIATION

स्टार्टअप आणि प्रस्थापित उद्योजकांना उत्पादन प्रक्रिया समजून घेण्यासाठी हा दौरा उपयुक्त ठरणार आहे.

१३ मे रोजी बारामतीतील उद्योजकांचे शिष्टमंडळ दिल्लीकडे रवाना होईल आणि प्रदर्शनासह दिल्लीतील प्रेक्षणीय स्थळांना भेट देईल. या अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी असोसिएशनचे खजिनदार अंबिरशाह शेख वकील यांच्याशी ९५७९३०२३०३ या क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदवण्याचे आवाहन धनंजय जामदार यांनी केले आहे.

# दौंड, शिरूरमध्ये बिबट्यांसह आता गव्यांचे संकट; चारा-पाण्यासाठी वन्यप्राण्यांची भटकंती

**नानगाव । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून दौंड आणि शिरूर तालुक्यात बिबट्यांचा अधिवास आहे. त्यामुळे दोन्हीही तालुक्यांतील परिस्थिती बिबट्यांच्या वावरामुळे भीतीदायक झाली आहे. त्यातच आता गव्यांचे नवे संकट समोर उभे ठाकले आहे. त्यामुळे दौंड आणि शिरूर तालुक्यातील नागरिक व शेतकर्यांना सध्या दुहेरी संकटाला तोंड द्यावे लागत आहे.



बिबट्यांचा वावर आणि दिवसेंदिवस जनावरांसह माणसांवर होणारे हल्ले यामुळे नागरिक भीतीच्या छायेत आहेत. त्यातच आता गव्याच्या नव्या संकटामुळे सर्वांचीच झोप उडाली आहे. बिबट्यांचे डोक्यावरील संकट दिवसेंदिवस काळजाचा थरकाप उडवणारे ठरत असताना आता काळजाचे पाणी करणारे संकट सध्या दौंड आणि शिरूर तालुक्यातील नागरिकांपुढे मोठे संकट म्हणून उभे आहे. डोंगर भागात व जंगल परिसरात मनुष्यवस्ती विरळ असते. त्यामुळे अशा भागात वन्यप्राण्यांची भीती कमी असते. मात्र, बागायती भागासह लोकवस्ती व मोठमोठ्या गावांमध्ये वन्यप्राण्यांचा धोका जास्त असतो. आत्तापर्यंत अशा अनेक ठिकाणी जनावरांवर हल्ले झाले. त्यात काही ठिकाणी जनावरे दगावली. तसेच, अनेक ठिकाणी मनुष्यावर हल्ले झाले असून, यात काही मनुष्य दगावले आहेत. त्यामुळे सध्यातरी दोन्हीही तालुक्यांतील गावांमध्ये बिबट्यांची दहशत मोठ्या प्रमाणावर पाहवयास मिळते.

त्यातच आता दौंड तालुक्यातील पारगाव सा.मा. आणि शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील गणेगाव दुमाला या भागात शेतकरी व नागरिकांना गव्याचे दर्शन झाले. हे गवे मोठमोठे होते. ज्यांनी ते पाहिले त्यांना भीती वाटली. त्यामुळे बिबट्यांच्या पाठोपाठ आता गव्यांची देखील मोठी दहशत निर्माण झाल्याची वस्तुस्थिती पाहावयास मिळत आहेत. मात्र, हे गवे आले कुठून, याची चर्चा सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. एकीकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, तर दुसरीकडे कमी होणारे जंगल यामुळे वन्यजीव पाणी, निवारा व चार्याच्या शोधार्थ बागायती भागापर्यंत पोहचतात. बागायती भागात या महत्त्वाच्या तिन्ही गोष्टी बाराही महिने उपलब्ध असल्याने हे वन्यजीव याच भागात वास्तव्य करतात. कालांतराने यांची उत्पत्ती होते आणि मग संख्या मोठी झाल्यावर शेतीपिकांचे नुकसान होणार असल्याचे शेतकर्यांकडून सांगण्यात आले. एखादे मोठे संकट ओढवण्याआधी वन विभागाने या समस्येकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे.

# लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन संपविले जीवन; चौघांवर गुन्हा दाखल

**वाघोली । प्रतिनिधी**

केसनंद येथे एका व्यक्तीने लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन संपविले जीवन. त्याने सुसाईड नोट लिहिली होती. याप्रकरणी चौघांवर वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामदास शिंदे (रा. कदमवाकवस्ती) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी कानिफनाथ अवताडे (रा. नायगाव), मुन्नीराम चौधरी (रा. थेऊर फाटा), नंदकुमार सातव (रा. सहजपूर), राजेंद्र खेडेकर (रा. शुक्रवार पेठ) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर तेजस शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिंदे यांनी लोणीकाळभोर येथील मंगल कार्यालयात डेकोरेटरचे काम केले होते. मंगल कार्यालयाचे मालक खेडेकर यांनी अवताडे, मुन्ना यांच्या सांगण्यावरून टोचून बोलून, अपमानास्पद वागणूक दिली. नंतर कामावरून काढून टाकले. तसेच सातव यांच्याकडूनही शिंदे यांना त्रास होत होता. या त्रासाला कंटाळून शिंदे यांनी संपविले जीवन.